रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १३८ । पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २६ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

## अभिनेते सतीश शहांचे निधन



**मुंबई :** बॉलीवूड आणि टीव्ही क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेता सतीश शहा यांचे शनिवारी २५ ऑक्टोबर रोजी निधन झाले आहे. निधनसमयी ते ७४ वर्षांचे होते. मिळालेल्या माहितीनुसार, सतीश शहा गेल्या काही काळापासून किडनीशी संबंधित आजाराने त्रस्त होते. सतीश शहा यांच्या पार्थिवावर रविवारी २६ ऑक्टोबर रोजी अंत्यसंस्कार होणार आहेत. सतीश शहांच्या निधनाने चित्रपट आणि टीव्हीजगतात शोककळा पसरली आहे. सतीश शहा यांनी आपल्या करिअरमध्ये अनेक चित्रपटांमध्ये काम केले, परंतु त्यांना घराघरात ओळख •➤पान २ वर

## रायगड जिल्ह्याला यलो अलर्ट

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पाऊस पडत आहे. सायंकाळच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पाऊस कोसळत आहे. शनिवारी जिल्ह्यामध्ये एकूण १५० मि.मी. पाऊस पडला असून, सरासरी ९.३८ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे. हा पाऊस सोमवारी (दि.२७) पर्यंत असणार आहे. या कालावधीत रायगड जिल्ह्याला यलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी विनाकारण बाहेर पडू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

शुक्रवारी सायंकाळपासून पाऊस जोरदार पडत आहे. त्यामुळे अनेक सखल भागात पाणी साचले आहे. अचानक पडलेल्या पावसामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाली. पावसापासून बचाव करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. •➤पान २ वर

### पावसावर दृष्टीक्षेप

अलिबाग- २६.००, उरण- ३.००, कर्जत- २.००, रोहा- २२.००, सुधागड- ४९.००, माणगाव- ११.००, तळा- ४.००, महाड- १७.००, पोलादपूर- ९.००, श्रीवर्धन- २.००, म्हसळा- ५.०० अशी दिवसभरात एकूण १५० मि.मी. पावसाची नोंद झाली असून, त्याची सरासरी ९.३८ मि.मी. इतकी आहे.

### प्रवासी बोटी बंद

मागील चार दिवसांपासून जिल्ह्यात सायंकाळी पाऊस पडत आहे. या पावसामुळे प्रवाशांसह नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. समुद्र खवळण्याचा धोका निर्माण झाल्याने शनिवारी दुपारपासून मांडवा येथील प्रवासी बोटी बंद ठेवण्याच्या सूचना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दिल्या. त्यामुळे दुपारपासून जलवाहतूक सेवा बंद करण्यात आली आहे.

## वे|ध|क

### पोलीस भरती आचारसंहितेत लटकणार?

**मुंबई :** गृह विभागाने २० ऑगस्ट रोजी शासन निर्णय काढून १५ हजार ६३१ पोलिस शिपायांची भरती करण्याचे जाहीर केले. शासन निर्णय निघून दोन महिने उलटले, तरी अद्याप अर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू झालेली नाही. गृह विभागाकडून भरतीस अंतिम मान्यताच मिळाली नसल्याची बाब आता पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस भरती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आचारसंहितेत अडकण्याची शक्यता आहे. राज्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत रिक्त होणाऱ्या पोलीस शिपायांची पदे भरण्यात येणार आहेत.

## 1069 हेक्टर शेती संकटात

### परतीच्या पावसाने भातशेती आडवी

**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**

भातकापणीला सुरुवात झाली आहे. आतापर्यंत ३० टक्क्यांहून अधिक कापणीची कामे पूर्ण झाली आहेत. भाताची रोपे कापून सुकविण्यासाठी शेतामध्ये ठेवण्यात आली असताना गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्यात परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. हातातोंडाशी आलेला घास पावसात भिजून गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. जिल्ह्यामध्ये २३ दिवसांमध्ये झालेल्या अवकाळी पावसात एक हजार ६९.९२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, ६९१ गावांमधील पाच



हजार ६४२ शेतकऱ्यांना फटका बसला आहे. भातशेती संकटात सापडल्याने आल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

जिल्ह्यात यावर्षी •➤पान २ वर

### मदतीची प्रतीक्षा

जिल्ह्यात बहुतांशी शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून भातशेती करण्यावर भर देतात. शासनाकडून येणाऱ्या वेगवेगळ्या योजना अनेकवेळा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. तरीदेखील शेतकरी त्याकडे दुर्लक्ष करीत आपल्या परीने भातशेतीची लागवड करतात. जिल्ह्यातील असंख्य शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह केवळ भातशेतीवर अवलंबून आहे. भातशेतीला चांगल्या पद्धतीने बहर आला होता. परंतु, अवकाळी पावसाने दगा दिला. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा आहे.

“ कापणीचा हंगाम सुरू झाला आहे. मात्र, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. दरदिवशी नुकसानीचा प्राथमिक अहवाल घेतला जात आहे. २३ दिवसांत झालेल्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल तयार केला आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे भातपिकाचे नुकसान झाले आहे. ग्रामसेवक, कृषी सहाय्यक व तलाठी यांच्या माध्यमातून नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार आदेश काढण्यात आले आहेत.

– वंदना शिंदे,
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ”







### प्रशांत बनकरला अटक, बदने फरारच

**सातारा :** साताऱ्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्याप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील दुसरा प्रमुख आरोपी प्रशांत बनकर याला पोलिसांनी पुण्यातून अटक केली आहे. मित्राच्या फार्म हाऊसवर लपून बसलेल्या बनकरला ग्रामीण पोलिसांनी पहाटे चार वाजता ताब्यात घेत शहर पोलिसांकडे सोपवले. प्रशांतवर डॉ. संपदा मुंडे यांचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा आरोप आहे.

## अखेर जयेंद्र भगत यांच्यावर गुन्हा दाखल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

संशयित भेकर या संरक्षित वन्य प्राण्याचे मांस बाळगल्याप्रकरणी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत यांच्याविरोधात वन विभागाने कारवाई केली असून, त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे भगत यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता अधिक वाढली आहे.

भाऊबीजेचा सण जिल्ह्यात साजरा होत असताना, गुरुवारी सायंकाळी जयेंद्र भगत यांच्या घरावर अलिबाग पोलिसांनी छापा टाकला. पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे याच्यासह त्यांच्या पथकाने कारवाई केली. घरातील किचनमधील फ्रीजमध्ये वन्यजीवन प्राण्याचे मांस असल्याचे आढळून आले. त्यांच्याकडून मांस जप्त करून ते वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले. शुक्रवारी सकाळपासून संशयित आरोपी जयेंद्र भगत यांची चौकशी सुरु होती. अखेर दोन दिवसांनंतर वन विभागाने जयेंद्र भगत यांच्याविरोधात •➤पान २ वर

## उपजिल्हा रुग्णालयात मृतदेहाची अदलाबदल

### अंत्यविधी उरकल्याने नातेवाईकांना मिळाली फक्त राख

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

उपजिल्हा रुग्णालयात घडलेला एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शवागरात ठेवण्यात आलेला मृतदेह दुसऱ्याच नातेवाईकांना देण्यात आल्याने अंत्यविधी पार पडलेल्या व्यक्तीची राख नातेवाईकांना मिळाली आहे. घडलेल्या या प्रकारामुळे मृतांच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त केला आहे.

यापूर्वी कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात मृतदेहाच्या अदलाबदलीचा प्रकार घडला होता. नावातील साधर्म्यामुळे हा प्रकार घडला होता. मृताच्या नातेवाईकांना वेळीच हा प्रकार लक्षात आल्याने अदलाबदली झालेल्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले नव्हते. उपजिल्हा रुग्णालयात घडलेल्या घटनेत मात्र बदली झालेल्या मृतदेहावर अंत्यसंस्कार पार पडले होते. मिळालेल्या माहितीनुसार, सुशांत मल्ला या नेपाळी व्यक्तीचे दुर्दैवी निधन झाले. नेपाळमधील त्याचे नातेवाईक शव घेण्यासाठी यायला उशीर लागणार असल्याने त्यांचे पार्थिव पनवेलमधील •➤पान २ वर

### प्रशासन निष्काळजी

हा प्रकार अत्यंत निंदनीय ठरत आहे. कारण, साधारणतः मृत व्यक्तीचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यापूर्वी शवागरात पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत कागदपत्रांची पडताळणी करून ओळख पटवली जाते.या सर्व प्रक्रियेचे उद्दिष्टच अचूकता राखणे असते. मात्र, या प्रकरणात ती यंत्रणा पूर्णतः फेल ठरल्याचे आणि प्रशासनाच्या निष्काळजी कामगिरीचे तीनतेरा वाजले आहेत.



# मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग लवकरच दहापदरी

## १४ हजार कोटींचा प्रस्ताव सरकारकडे सादर



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सध्या सहापदरी असलेला मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आता आठऐवजी दहा पदरी करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) याबाबत निर्णय घेतला असून, यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. येत्या १० दिवसांत हा प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे. महामार्गाचे दहा पदरीकरण झाल्यास मुंबई-पुणे प्रवास वाहतूक कोंडीमुक्त आणि अतिजलद होईल.

एमएसआरडीसीने बांधलेला मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग अत्यंत महत्त्वाचा आणि सर्वाधिक वर्दळीचा महामार्ग आहे. या महामार्गावरून दररोज ६५ हजारांहून अधिक वाहने धावतात. आता हा महामार्ग अपुरा पडू लागला आहे. वाहतूक कोंडीची समस्या भेडसावू लागली असून, वाहनचालक - प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन एमएसआरडीसीने भविष्यातील वाढत्या वाहनांना सामावून घेण्यासाठी सहा पदरी महामार्गाचे रूपांतर आठ पदरी महामार्गात करण्याचा निर्णय घेतला.

दोन्ही बाजूने एक-एक मार्गिका वाढविण्यात येणार होती. यासाठी ६ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित होता. मात्र या महामार्गाचे महत्त्व आणि वाढती वाहनसंख्या लक्षात घेता काही महिन्यांपूर्वी एमएसआरडीसीने या महामार्गाचे आठऐवजी दहा पदरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव जूनमध्ये राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार होता. मात्र, त्यास काहीसा विलंब झाला असला तरी आता लवकरच यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. महामार्गाच्या दहापदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सध्या सल्लागाराच्या माध्यमातून सुरू आहे. हे काम अंतिम टप्प्यात असून, लवकरच प्रस्ताव पूर्ण होईल.

येत्या दहा-बारा दिवसांत प्रस्ताव राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येईल, अशी माहिती उच्चपदस्थ सूत्रांनी दिली आहे. या प्रस्तावाला मान्यता दहा मिळाल्यास पुढील कार्यवाही करून बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबवविण्यात येईल. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पदरीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. कंत्राटदाराला चार वर्षांत हे काम पूर्ण करावे लागणार आहे. त्यामुळे २०३० पर्यंत महामार्गाचे दहा पदरीकरण पूर्ण होण्याची शक्यता आहे. हायब्रिड न्युइटी मॉडेलआठ पदरीकरणासाठी ६ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित होता. पण आता दहा पदरीकरणासाठी अधिक जमीन संपादित करावी लागणार असून, बोगद्यांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे या दहापदरीकरणासाठी १४ हजार कोटी रुपये खर्च येईल, अशी शक्यता व्यक्त होत होती. मात्र, आता खर्च १७ हजार कोटी रुपयांहून अधिक होण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. वाढता खर्च लक्षात घेता दहा पदरीकरणाचा प्रकल्प हायब्रिड न्युइटी मॉडेलद्वारे मार्गी लावण्यात येणार आहे.

### कोंडी फुटणार

एमएसआरडीसीने बांधलेला मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग अत्यंत महत्त्वाचा आणि सर्वाधिक वर्दळीचा महामार्ग आहे. या महामार्गावरून दररोज ६५ हजारांहून अधिक वाहने धावतात. आता हा महामार्ग अपुरा पडू लागला आहे. वाहतूक कोंडीची समस्या भेडसावू लागली असून, वाहनचालक, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# नुकसानीबाबत ठोस निर्णय घ्या



## शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांचा इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, शासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केली आहे. घरत म्हणाले, पिके कापणीस तयार होती. अनेक शेतकऱ्यांनी भात शेतातच ठेवला होता. पण अवकाळी पावसाने संपूर्ण मेहनतीवर पाणी फिरवलं. काहींची पिकं वाऱ्याने पडली, काहींच्या शेतात पाणी साचलं. हा केवळ पिकांचा नाही तर शेतकऱ्यांच्या आशेचा अंत आहे.

ते पुढे म्हणाले, याआधीही पंचनामे झाले, पण एकाही शेतकऱ्याच्या खात्यात मदतीचा एक रुपयाही जमा झालेला नाही. फक्त कागदोपत्री आश्वासनं आणि फोटोसेशन! जर शासनाने पुन्हा स्थानिक शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसायचा प्रयत्न केला, तर या वेळेस शेतकऱ्यांचा रोष अनावर होईल. हा रोष आवाजात नाही, तर कृतीतून उमटेल. घरत यांनी सत्ताधारी लोकप्रतिनिधींवर थेट टीका करत सांगितले की, सत्तेत असणाऱ्यांनीच हा आवाज उठवायला हवा होता.

> शासन जागं होईल की शेतकऱ्यांचा स्फोट दाखवेल? हा प्रश्न आज प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात आहे. पण एक गोष्ट निश्चित, शेकाप शेतकऱ्यांना कधीच एकटं सोडणार नाही. हा पक्ष जनतेचा आहे, जनतेसाठी आहे आणि जनतेसाठीच लढतो आहे.
>
> – सुरेश घरत
> तालुका चिटणीस, शेतकरी कामगार पक्ष, अलिबाग

सत्ताधाऱ्यांकडून काहीच आशा नाही. ते केवळ पदासाठी सत्तेत आहेत, पण जनतेच्या वेदनेपासून कोसो दूर आहेत. ते म्हणाले, शेतकऱ्यांच्या या वेदनेची किंमत केवळ नुकसानभरपाई नाही, तर त्यांच्या मेहनतीला योग्य न्याय मिळवून देणे आहे. शेतकरी कामगार पक्ष यासाठी कटिबद्ध आहे. आजही आणि उद्याही शेकापच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील. ही आमची वचनबद्धता आहे, आणि ही जनतेला खात्री आहे.

# वृद्धाश्रमातील ज्येष्ठांची दिवाळी गोड

## कृषक कल्याणकारी संस्थेकडून फराळाचे वाटप



**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चौल नाका येथील नीलाक्षी सहजीवन वृद्धाश्रमातील ज्येष्ठांची चौलमधील कृषक कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून फराळ वाटप करुन दिवाळी गोड करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे सचिव प्रकाश पाटील यांनी, फराळ वाटप हे फक्त निमित्त असून, आपणा सर्व ज्येष्ठांबरोबर हितगुज करणे हा आमचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी, आपल्यासारख्या ज्येष्ठ व्यक्तींसोबत दीपावलीचा एक दिवस साजरा करण्यात आम्हाला वेगळाच आनंद अनुभवायचा मिळतो, दारावरच्या टिकटिककडे लक्ष द्या, ही आधुनिक चिऊ-काऊ गोष्ट सांगितली.

या कार्यक्रमास रवींद्र पाटील, दिलीप पाटील, प्रकाश पाटील, विनायक थळकर, उदय म्हात्रे, प्रमोळ पडते, सिद्धराज पाटील आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रकाश पाटील यांनी केले.

# जानेवारीत होणार जिल्हा युवा महोत्सव

## २९ ऑक्टोबर रोजी होणार जिल्हास्तर स्पर्धा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

युवकांचा सर्वांगीण विकास साधणे, भारतीय संस्कृती व परंपरा जपणे तसेच युवकांच्या सुप्त गुणांना वाव देत राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणे या उद्देशाने युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

याच पार्श्वभूमीवर सन २०२५-२६ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅक दि. १० ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. त्याअनुषंगाने रायगड जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन दि. २९ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे.

या महोत्सवात युवकांसाठी विविध स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, कथालेखन, चित्रकला, लोकनृत्य (गट), लोकगीत (गट), कवितालेखन, नवोपक्रम (विज्ञानदर्शन) या उपक्रमांचा समावेश आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या १५ ते २९ वयोगटातील युवक-युवती तसेच युवा मंडळांनी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं ५ वाजेपर्यंत करावी. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.

# चारिझेन फाऊंडेशनच्या कार्यालयाचे उद्घाटन




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सेवाभावी संस्थांतर्फे एक ओळखल्या जाणाऱ्या चारिझेन फाऊंडेशनच्या माणगाव कार्यालयाचा उद्घाटन समारंभ बुधवार, दि.२२ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वा. माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

याप्रसंगी फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, संचालिका पूजा रंधावा, विधी सल्लागार सचिन वाघ, उपाध्यक्ष सतीश काळे, कोऑर्डिनेटर राकेश पडवळ, फाऊंडेशनचे व्यवस्थापक विलास आठवले, सभासद किशोर झेमसे, कमलेश विश्वकर्मा, श्यामसुंदर तेवर, संजय गोडबोले, आरीफा पाल व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या. सदरचे कार्यालय अशोकदादा साबळे विद्यालयासमोर कचेरी रोड माणगाव याठिकाणी सुरू करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास भाजप प्रदेश महिला मोर्चा सचिव यशोधरा गोडबोले,माणगाव उपनगराध्यक्ष हर्षदा काळे,माणगाव विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सुमित काळे, युवा उद्योजक यश गोडबोले, ठाकूर सर, नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी केंद्रप्रमुख शंकर शिंदे, संस्थेचे कोऑर्डिनेटर राकेश पडवळ व सभासद किशोर झेमसे यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करीत फाऊंडेशनला शुभेच्छा दिल्या. या उद्घाटनपर कार्यक्रमात फाऊंडेशनच्या मागील उपक्रमांचे दर्शन घडविणारे फोटो प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

# तलावात पडल्याने एकाचा मृत्यू

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पाण्याच्या तलावात पडून ३८ वर्षीय इसमाचा मृत्यू झाला. या घटनेचीनोंदपनवेलतालुकापोलीस ठाण्यात करण्यात आली. दिनेश दत्ताराम पाटेकर हा चेतूज फार्म हाऊस, मालडुंगे येथे केअरटेकर म्हणून काम करतो. २२ ऑक्टोबर रोजी मालडुंगे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या तलावात पडून बुडून त्याचा मृत्यू झाला. याबाबत परिसरातील नागरिकांना समजल्यावर त्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत. मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# दीपोत्सवात ‘बळीराजा’चा सन्मान

- एकोप्याच्या प्रकाशाने उजळला परिसर
- सात हजार दिव्यांनी परिसर निघाला न्हाऊन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मीरा रोडमधील पेणकर पाडा परिसरात यंदाच्या दिवाळीत नागरिकांनी साजरा केलेला दीपोत्सव विशेष ठरला. ‘‘बळीराजाला बळ देणारा दीपोत्सव’’ या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात तब्बल सात हजार दिव्यांच्या प्रकाशात ‘बळीराजा’ची आकर्षक प्रतिकृती साकारण्यात आली. आई निर्बादेवी परिसरात साजऱ्या झालेल्या या अनोख्या दीपोत्सवाने एकोप्याचा संदेश दिला असून, सोशल मीडियावर या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

स्थानिक नागरिकांनी स्वतः हून पुढाकार घेऊन दिवे, तेल, सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तूंची जमवाजमव केली. या उपक्रमात लहान मुले, तरुण वर्ग, महिला, पुरुष तसेच ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. ‘सामाजिक बांधिलकी जपत एकत्र येणं हाच दीपोत्सवाचा खरा अर्थ’ असा संदेश देत नागरिकांनी समाजातील एकोपा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला.

या दीपोत्सवाची सुरुवात लॉकडाऊनच्या काळात झाली होती. त्या काळात समाजात निर्माण झालेला दुरावा मिटवण्यासाठी दीपांच्या माध्यमातून जवळीक निर्माण करण्याची कल्पना राबवली गेली. त्यानंतर दरवर्षी वेगवेगळ्या सामाजिक संकल्पना मांडत हा दीपोत्सव साजरा होत आहे. पहिल्या वर्षी तब्बल ३,५०० दिव्यांनी ‘‘वॅक्सिंग जागरूकता’’ या विषयावर दीपमाला सजवली होती.

यानंतर भारताच्या अमृत महोत्सवात ७५ हजार दिव्यांनी भारतमातेचा जयघोष केला. छत्रपती शिवाजी महाराजांना दीपांच्या माध्यमातून मानवंदना देण्यात आली, तर गेल्या वर्षी उद्योगजगताचे प्रेरणास्थान रतन टाटा यांना श्रद्धांजली म्हणून त्यांची प्रतिकृती साकारण्यात आली. यावर्षीचा दीपोत्सव मात्र शेती आणि शेतकऱ्यांना अर्पण करण्यात आला आहे. ‘‘जगाचा पोशिंदा आमचा बळीराजा त्याच्या सोबत आम्ही आहोत’’ हा संदेश देत शेतकऱ्यांच्या संघर्षाशी एकात्मता व्यक्त करण्यात आली.

# खेळाडूंशिवाय मैदाने ओस; अधिकाऱ्यांनी मुख्यालयी असावे

## क्रीडा मार्गदर्शक सतीश कापसे यांनी क्रीडा मंत्र्यांसमोर मांडल्या समस्या




**। जालना । प्रतिनिधी ।**

खेळ, खेळाडू, खेळ भावना वाढवी यासाठी राज्य सरकारने अनेक ठिकाणी क्रीडांगणाची उभारणी केली. मात्र, या मैदानातील खेळाडूंची संख्या दिवसेंदिवस रोडावत चालली आहे. त्यामुळे खेळवाढीला, खेळाडूंच्या प्रगतीला खीळ बसत असल्याची खंत क्रीडा मार्गदर्शक सतीश कापसे यांनी दस्तुरखुद्द राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासमोर मांडली.

छत्रपती संभाजी नगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत युवा व क्रीडा संवादाचे आयोजन करण्यात आले होते. मंत्री कोकाटे यांचेसह क्रीडा क्षेत्रातील अधिकारी, खेळाडू यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा किंवा तालुकास्तरावरील क्रीडा अधिकारी असतील, संघटक असतील या स्तराच्या अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहण्याची आवश्यकता आहे.खेळ वाढल्यास खेळाडू वाढतील त्यातून ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

क्रीडा मंत्रालयाने या समस्यांकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. याचसोबत राज्यातील क्रीडा संकुले डिजिटल पद्धतीने जोडली जावी, त्यातून अधिकाऱ्यांच्या, खेळाडूंच्या उपस्थितीवर राज्य सरकारने लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी कापसे यांनी केली. यावेळी वूशू असोसिएशनचे जिल्हा सचिव विनोद चौबे यांची उपस्थिती होती.

पान १ वरून

## अभिनेते सतीश शहांचे निधन

मिळवून दिली ती प्रसिद्ध टीव्ही शो ‘साराभाई वर्सेस साराभाई’मधील इंद्रवदन साराभाई उर्फ इंदू या भूमिकेने. या कॉमेडी शोमधील त्यांचे काम आजही लोकांच्या मनात घर करून आहे.

सतीश शहा यांचा जन्म गुजरातमधील मांडवी येथे झाला होता. झेवियर्स कॉलेजमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामधून आपले शिक्षण पूर्ण केले. सतीश शहा यांनी आपल्या करिअरची सुरुवात बॉलीवूड चित्रपटातून केली होती. त्यांचा पहिला चित्रपट भगवान परशुराम होता. त्यानंतर ते अरविंद देसाई की अजीब दास्तान, गमन, उमराव जान, शक्ति, जाने भी दो यारों, विक्रम बेताल अशा अनेक चित्रपटांमध्ये दिसले. फक्त हिंदीच नाही तर गम्मत जम्मत, वाजवा रे वाजवासारख्या मराठी चित्रपटांतही त्यांनी काम केलं होतं.

## १०६९ हेक्टर शेती संकटात

८६ हजार हेक्टर क्षेत्रावर भातपीक लागवड करण्यात आली आहे. भातपीक चांगल्या पद्धतीने बहरल्याने शेतकरी आनंदी होते. परंतु, परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या आनंदावर विरजण पडले. जिल्ह्यात भातपीक कापणीची कामे सुरू असून, कापणी केलेले भातपीक शेतांमध्ये सुकविण्यासाठी ठेवण्यात आले. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून सायंकाळी होणाऱ्या पावसात भातपीक भिजून गेले आहे. भातपीक वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. रोज सायंकाळी पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कापणीयोग्य भात वेळेवर कापले नाही, तरी नुकसान आणि कापून ठेवले तरी नुकसान, अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. हवामान खात्याने यले अलर्टचा इशारा दिला. त्यानुसार जिल्ह्यात पाऊस कोसळला. या पावसात भातशेती पाण्याखाली गेली आहे. दि. १ ते २३ ऑक्टोबर या कालावधीत पडलेल्या पावसामध्ये एक हजार ६९८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यापूर्वीदेखील हजारो हेक्टर क्षेत्र पाण्याखाली गेले. विशेष करून खारेपाटातील भातशेतीला या पावसाचा फटका प्रचंड बसला आहे. ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. जिल्ह्यातील रोहा, पोलादपूर, कर्जत या तालुक्यांतील शेतीच्या क्षेत्राचे नुकसान अधिक झाल्याचा प्राथमिक अहवाल कृषी विभागाकडून प्राप्त झाला आहे.

**नुकसानीवर दृष्टीक्षेप**

| तालुके | बाधित शेतकरी | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| अलिबाग | ११७ | ४२ |
| पेण | १० | ३.८० |
| मुरूड | १७७ | ४७.५२ |
| खालापूर | १५३ | ३३.१७ |
| कर्जत | ४५१ | १७१.८६ |
| पनवेल | १०२ | २९.४० |
| उरण | ४७ | १०.७० |
| माणगाव | २३४ | ७५.७९ |
| तळा | ८६ | १६.५० |
| रोहा | २७०० | ९५० |
| सुधागड पाली | ३१६ | १२५.३५ |
| महाड | १६३ | ३४.८० |
| पोलादपूर | ९३८ | १२७.२० |
| म्हसळा | ९४ | २१ |
| श्रीवर्धन | ५४ | ९.८३ |
| एकूण | ५६४२ | १६९८.९२ |

**ओला दुष्काळ जाहीर करा**

जिल्ह्यामध्ये सुरुवातीपासूनच पावसाने थैमान घातले आहे. भातपीक बहरून कापणीयोग्य झाले असून, अनेकांनी कापणीला सुरुवात केली. विशेष म्हणजे, खारेपाटात कापणीची लगबग मोठ्या प्रमाणात सुरु असताना गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे भातपिकांची अवस्था दयनीय झाली आहे. शेते पाण्याने भरली आहेत. त्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## जयेंद्र भगत यांच्यावर गुन्हा दाखल

वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार वन गुन्हा नोंदविला. जप्त केलेल्या मांसाचा तुकडा सील करून तपासणी संस्थेत नमुना तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. अलिबाग पोलिसानंतर वन विभागाच्या चौकशीच्या फेऱ्यात जयेंद्र भगत सापडले आहेत. त्यामुळे त्यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ते मांस कुठून आणले. यामध्ये आणखी किती जणांचा सहभाग हे अद्यापपर्यंत वन विभागाने स्पष्ट केले नाही.

**वन विभागाकडून आवाहन**

वन्यजीवन प्राण्यांची शिकार करण्यास बंदी आहे. वन्यजीव प्राण्यांची शिकार करून नये. त्यांचे मांस जवळ बाळगू नये. असे प्रकार होत असल्यास न घाबरता, तात्काळ अलिबाग वन विभागास माहिती द्यावी, असे आवाहन वन परिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील यांनी केले आहे.

## रायगड जिल्ह्याला यलो अलर्ट

अलिबाग एसटी बसस्थानकात पाणी साचल्याने प्रवाशांची प्रचंड गैरसोय झाली होती. रात्रीपासून पाऊस सुरुच राहिला. ढगांच्या गडगडासह वादळी पाऊस पडत होता. शनिवारीदेखील दुपारपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले. काही ठिकाणी पावसाची रिपरिप सुरुच होती. शनिवारी जिल्ह्यामध्ये १५० मि.मी. पाऊस पडल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. वारा पावसामुळे समुद्रात गेलेल्या बोटीदेखील माघारी फिरवून किनारी आणण्यात आल्या आहेत. या अवकाळी पावसाचा मासेमारीवरही परिणाम झाला आहे.

## उपजिल्हा रुग्णालयात मृतदेहाची अदलाबदल

उपजिल्हा रुग्णालयातील शवागरात ठेवण्यात आले होते. त्याच वेळी दुसऱ्या एका नेपाळमधील नागरिकाचे शवदेखील शवागरात ठेवण्यात आले होते. मात्र, त्या व्यक्तीच्या नातेवाईकांच्या हवाली सुशांत यांचे शव करण्यात आल्याने त्यांच्याकडून अनावधनाने सुशांत यांच्यावर अंत्यसंकार करण्यात आले. जेव्हा मल्ला यांचे नातेवाईक रुग्णालयात पोहोचले, तेव्हा त्यांना मृतदेह मिळालाच नाही.रुग्णालय प्रशासनाकडून शोध घेतल्यानंतर असे स्पष्ट झाले की, सुशांत मल्ला यांचा मृतदेह चुकीच्या ओळखीतून दुसऱ्या नेपाळी कुटुंबाला देण्यात आला होता, आणि त्या कुटुंबाने त्या मृतदेहाचे अंत्यसंस्कारही पूर्ण केले होते.या घटनेनंतर उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रशासनाने दिलगिरी व्यक्त केली असून, या गंभीर चुकीची अंतर्गत चौकशी सुरू असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, सुशांत मल्ला यांच्या खऱ्या नातेवाईकांनी मोठी धावपळ करून संपूर्ण घटना तपासली. मात्र, त्यांना आपल्या प्रिय व्यक्तीचा मृतदेह परत मिळू शकला नाही. अखेरीस त्यांनी त्या ठिकाणी जाऊन अंत्यसंस्कारानंतरची राख गोळा करून आणली.

हा प्रकार अत्यंत निंदनीय ठरत आहे. कारण, साधारणतः मृत व्यक्तीचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यापूर्वी शवागरात पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत कागदपत्रांची पडताळणी करून ओळख पटवली जाते. या सर्व प्रक्रियेचे उद्दिष्टच सुरक्षितता आणि अचूकता राखणे असते. मात्र, या प्रकरणात ती यंत्रणा पूर्णतः फ ेल ठरल्याचे आणि प्रशासनाच्या निष्काळजी कामगिरीचे तीनतेरा वाजल्याचे चित्र समोर आले आहे.या अमानवी व निष्काळजी प्रकारामुळे पनवेल परिसरात तसेच नेपाळी समाजात तीव्र संतापाची लाट उसळली असून, संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# दहावीच्या हिंदी पुस्तकात असंख्य चुका : कदम

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे द्वारा प्रकाशित २०२३ मध्ये पाचव्यांदा पुनर्प्रकाशित केलेल्या दहावीच्या पुस्तकात हिंदी लोकभारती पुस्तकातभारतीयसंविधानाचीउद्देशिक छापण्यात आली आहे. संविधानाच्या प्रस्ताविकेत जाणीवपूर्वक चुका केल्या आहेत, असा आरोप मिलिंद कदम यांनी केला आहे. संविधानाच्या प्रस्ताविकेत (उद्देशिका) चुका करणाऱ्या लेखक व प्रकाशन समितीवर कायदेशीर करवाई करावी आणि त्यातील चुका विनाविलंब दुरुस्त करूनच पुस्तक विद्यार्थ्यांना वितरित करावे, अशी मागणीही मिलिंद कदम यांनी केली आहे. विशेष म्हणजे, शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वर्षादरम्यानच्या अपत्याच्या शिक्षणाची जबाबदारी ही पालकांवर टाकण्यात आली आहे. खरं तर, ही जबाबदारी शासनाची आहे. जी भारतीय संविधान लागू झाल्याच्या ६० वर्षांनंतर ही पुरेपूर स्वीकारली नाही, असे कदम यांनी सांगितले.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक म न्यु टेक डेव्हलपर्स तर्फे भागीदार १. नितीन हेमराज मोता २. परषोत्तम नानजी पटेल ३.जिवराज भानजी पटेल ४. राजेश त्रीलोकचंद्र तुरखीयों यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ११४ | १ | ०-२५-३० | १-९२ |
| ११४ | २ | ०-२४-०० | १-८० |

तसेच वरील मिळकतीवरील सदनिका ज्यांचा कर्जत नगरपरिषद यांचे दप्तरी नमुद मालमत्ता क्रमांक ५३४ क्षेत्र ९३.१२ चौ.मी. व मालमत्ता क्रमांक ५३४/१ क्षेत्र ४२.२४ चौ.मी अशा वर्णनाची सदनिका मिळकत.

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २६/१०/२०२५

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

# दिवाळीच्या सुट्टीत रायगडचे किनारे हाऊसफुल्ल


(छायाचित्र : समीर मालोदे)





दिवाळीची सुट्टी पडल्याने मुंबई, पुणे, ठाणे तसेच इतर राज्यांतील पर्यटकांनी फिरण्यासाठी रायगड जिल्ह्याला पहिली पसंती दिल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील पर्यटन स्थळांवर हजारो पर्यटक पर्यटनासाठी कुटुंबीय, मित्रपरिवारासोबत आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील समुद्रकिनारे, प्रेक्षणीय स्थळे, गडकिल्ल्यांवर पर्यटकांची गर्दी पाहायला मिळत आहे. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे पर्यटकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, रायगडात आलेले पर्यटक समुद्रकिनाऱ्यांवर धम्माल मस्ती करतानाचे चित्र सर्वच ठिकाणी दिसून येत आहेत. जिल्ह्यातील अलिबाग, वरसोली, नागांव, आक्षी, काशीद, मुरुड, दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी झाल्याचे चित्र आहे.

## महामार्गावर वाहतूक कोंडी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

दिवाळीच्या सुट्ट्या आणि त्यानंतर शनिवार-रविवारच्या सुट्ट्या असल्यामुळे पर्यटक आपल्या खासगी वाहनांतून मुंबईकडे परत येत आहेत. त्यामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि मुंबई-गोवा मार्गावर भीषण वाहतूक कोंडीचा सामना प्रवाशांना करावा लागला. यावेळी २-३ किलोमीटरच्या रांगा लागल्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला.

मुंबई-गोवा महामार्गावर सलग पाचव्या दिवशी प्रवाशांना वाहतूक कोंडीचा फटका बसला आहे. दिवाळी सुट्टीत कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना वाहतूक कोंडीचा फटका बसला आहे.

### ■ प्रवाशांना मोठा फटका

मुंबई-गोवा महामार्गावर कोकणात जाणाऱ्या मार्गीकेवर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माणगाव शहर ते तिलोरे फाटापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पुण्याहून येणाऱ्या रोडवरदेखील वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

दिवाळीच्या सुट्ट्यांनंतर मुंबईकडे परतणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेसवे, मुंबई-गोवा महामार्ग आणि इतर महामार्गांवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत, त्यामुळे प्रवाशांना तासन्तास वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहेत.

## निवडक

### रायगड मित्र दिवाळी अंकाचे प्रकाशन



**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'रायगड मित्र दिवाळी अंक २०२५' चे प्रकाशन शेकापच्या महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या व राज्य सोशल मिडीया सेलच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सोमवारी (दि.२०) करण्यात आले. तसेच, या अंकाचे संपादक दिपक यशवंत पाटील यांचे देखील चित्रलेखा पाटील यांनी कौतुक केले. साहित्य कला मनोरंजन आणि प्रबोधन युक्त दिवाळी अंकाचे प्रकाशन करताना प्रकाशक क्षितिज पाटील, सह प्रकाशन राजेंद्र पाटील, श्रीकांत पाटील, उदय पाटील, तुकाराम पाटील, जीवन पाटील, अ‍ॅड. जीवीता पाटील, मुरलीधर पाटील, रुपेश पाटील, अनिल पाटील, अजित पाटील, ललीता पाटील, अ‍ॅड. प्रणाली पाटील, सरपंच राजेंद्र पाटील, संजया पाटील, विवेक पाटील, संजय पाटील, प्रमोद पाटील, डॉ. कृष्णकांत पाटील, अशोक पाटील व मनोहर पाटील आदी उपस्थित होते.

## मुरूडमधील किनारे पर्यटकांनी फुलले

**। मुरूड जंजिरा । प्रतिनिधी ।**

दीपावली सुट्टीचा आस्वाद घेण्यासाठी मुरूड तालुक्यातील काशीद व मुरूड समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची मोठी मांदियाळी उतरल्याचे शनिवारी (दि.२५) दिसून आले. पहिली आंघोळ आणि लक्ष्मीपूजनाचा विधी उरकून मुंबई-पुणे, ठाणे व पश्चिम महाराष्ट्रातून असंख्य पर्यटक समुद्रकिनारी मौज-मजेसाठी मुरूडमध्ये दाखल झाले आहेत. यावेळी पर्यटकांची सुमारे १ हजार वाहने परिसरात दाखल झाल्याचे काशीद येथील सूर्यकांत जंगम, मुरूड येथील हिरा रेसिडेंसीचे मालक महेंद्र पाटील, साईगौरी रेस्ट हाऊसचे मालक आणि जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले.



**तालुक्यातील मुरूड, काशीद समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची मांदियाळी**

**हजारो खासगी वाहने दाखल**

दिवाळीच्या पाडव्याच्या दिवसापासून चित्र बदलून काशीद, व मुरूड समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांचा पूर लोटल्याचे चित्र आहे. त्यामुळे पर्यटन व्यवसायाला पुन्हा उर्जितावस्था आली आहे. हजारोंच्या संख्येने पर्यटकांची मांदियाळी मुरूडमधील समुद्रकिनारी आनंद लुटण्यासाठी उतरली आहे. ठिकठिकाणी निवास व्यवस्था व हॉटेल गजबजून गेले आहेत. तसेच, दिवाळी सुट्टी असल्याने पर्यटकांची हजेरी स्थिर राहील, अशी माहिती महेंद्र पाटील व सूर्यकांत जंगम यांनी दिली. मुरूडमध्ये दरबार मार्गावर असणाऱ्या हॉटेल शोअर लाईन या पूर्ण शाकाहारी हॉटेलला अनेक पर्यटकांनी भेट देत शुद्ध शाकाहारी स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतल्याचे हॉटेलचे मॅनेजर धर्मेश मोरे यांनी सांगितले. तसेच, नांदगाव येथील सिद्धिविनायक देवस्थान, मुरूड येथील श्री दत्त देवस्थान, साळाव येथील गणेश देवस्थानलादेखील पर्यटक भेटी देऊन दर्शनाचा लाभ घेत आहेत. त्याचबरोबर पर्यटकांच्या वर्दळीने जंजिरा जलदुर्ग गजबजला आहे. राजपुरी जेट्टी, खोरा बंदर जेट्टी, दिघी बंदर जेट्टीवरूप पर्यटकांना जंजिऱ्यात जाण्याची जल प्रवासाची सुविधा असून असंख्य पर्यटक जंजिरा पाहण्यासाठी येत आहेत.

दरमयान, पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी सांगितले की, दोन दिवसांत जंजिरा पाहण्यासाठी सुमारे ५ हजार पर्यटकांनी भेट दिली. जंजिऱ्यात प्रवेश करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला २५ रुपये तिकीट असून १५ वर्षांखालील मुलांना विनामूल्य प्रवेश आहे. ऑनलाईन तिकीट काढल्यास २० रुपये तिकीट आहे, अशी माहिती येलीकर यांनी दिली.

## विनापरवानगी झाडाची कत्तल



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहरातील दाबक पाखाडी परिसरात रस्त्याच्या कडेला असलेली गुलमोहराची जिवंत झाडे बाजूच्या जागा मालकाने संबंधित प्रशासन किंवा वनखात्याची कोणतीही परवानगी न घेता कापून टाकल्याची घटना घडली आहे. अंदाजे ५० वर्ष वयाचे हे झाड या ठिकाणच्या नागरिकांना सावली देण्याचे काम करत होते. त्याचप्रमाणे त्याच्यावरती गुलमोहर फुलल्यानंतर त्या ठिकाणचे दृश्य अतिशय मनमोहक दिसत होते. आधीच चक्रीवादळामुळे श्रीवर्धन तालुक्यातील झाडांचे प्रचंड नुकसान झाले आहे, त्यात आणखी भर पडत असल्यामुळे पयावरण प्रेमींकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

श्रीवर्धन येथील अंजुमन हायस्कूल समोर राहणारे बर्डे हे मुंबई येथे वास्तव्यास असतात. त्यांची त्या ठिकाणी वाडी आहे. या वाडीच्या जागेमध्ये पूर्वी चाळ होती. या चाळीमध्ये श्रीवर्धनचे जुने कोर्ट देखील होते. मात्र, मागील वर्षी या वाडीची कुंपण काढून संपूर्ण चारी बाजूंनी पत्रे ठोकण्यात आलेले आहेत व आतमध्ये इमारत बांधण्याचे काम सुरू करण्याचा संबंधित जागा मालकाचा इरादा आहे. त्यामुळे समोरच असलेली दोन मोठी झाडे त्यांना अडथळा ठरत होती. त्यासाठी त्यांनी झाडे कापल्याचे उघड उघड बोलले जात आहे. आधीच श्रीवर्धन शहरात निसर्ग चक्रीवादळामुळे अनेक मोठमोठाले वृक्ष उन्मळून पडली आहेत. नारळ सुपारीच्या झाडांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे श्रीवर्धन शहरावर असलेली सावली काही प्रमाणात नाहीशी झाली असतानाच, अशा प्रकारे जर का झाडांची कत्तल होत राहिली तर श्रीवर्धन शहराचे वाळवंट झाल्याशिवाय राहणार नाही, अशी खंत काही पर्यावरणप्रेमी नागरिकांनी व्यक्त केली आहे. परंतु, काही बांधकाम व्यवसायिकांना या ठिकाणच्या असलेल्या वाड्या तोडून, टोलेजंग इमारती उभ्या करावयाच्या आहेत. त्यासाठी अशा प्रकारचे उद्योग सुरू आहेत.

याबाबत वनखात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांजवळ संपर्क साधला असून त्यांच्याकडून तसेच श्रीवर्धन नगर परिषदेकडून देखील वृक्ष तोडण्याची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता वनविभागाने संबंधित जागा मालकावरती गुन्हा दाखल करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.

## परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचा घास हिरावून घेतला

### नागोठणे परिसरात भातपीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या परतीच्या पावसाने संपूर्ण रोहा तालुक्यासह नागोठणे विभागातील पळस, निडी, वरवठणे, बाळसई, वांगणी, आमडोशी, पाटणसई, ऐनघर सुकेळी, हेदवली इत्यादी परिसरांमध्ये धुमाकूळ घातला आहे. या परतीच्या पावसाचा फटका सर्वच शेतकऱ्यांना बसला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या परतीच्या पावसाने हिरावून घेतला आहे. भातपिकांचे ऐन कापणीला सुरूवात होत असतांनाच या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. परिपक्व झालेले भाताचे पिक हे जमिनीवर पडुन पुन्हा त्याला कोंब



येत आहेत. त्यामुळे हा परतीचा पाऊस शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणत असल्याचे चित्र सर्वत्र निर्माण झाले आहे. अशा या परिस्थितीमुळे शेतकरी मोठ्या चिंतेत सापडला आहे.

परतीचा पाऊस हा दरवर्षी असाच धुमाकूळ घालत असतो. सध्या परतीच्या पावसाचा हंगाम सुरू आहे. गेल्या आठवड्याभरापासुन हा पाऊस दुपारी किंवा सायंकाळी ढगांच्या गडगडाटासह सुरू होतो. नागोठणे विभागात गेले ५६ दिवसांपासून परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. परंतु परिस्थिती कशीही असली तरी शेतीची कामे ही वेळेतच पुर्ण करावी लागतात. त्यामुळे काढणीला आलेल्या भातशेतीत पावसाचे पाणी साचल्यामुळे भातशेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. भाताच्या पुर्णपणे तयार झालेल्या लोंबी अक्षरशः शेतातील चिखलामध्ये पडुन पुन्हा कोंब येण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतक-याला डोक्याला हात लावून बसण्याची वेळ आली आहे.

दरम्यान, परतीच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात झालेले भातशेतीचे नुकसान पाहता राज्य सरकारने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

> **वेळेत भात कापणी करून भाताचे भारे सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येत असतात. सकाळपासून भात कापणी केल्यानंतर भाताचे भारे बांधण्याच्या वेळी किंवा भारे नेत असताना दुपारी, संध्याकाळी कधीही परतीचा तुफानी पाऊस पडत असल्याने भात पिकांचे नुकसान होत आहे. मजुरांची कमतरता, वाढलेली मजुरी यामुळे शेतीतून झालेला खर्चही निघत नसल्याने त्यात भर म्हणून परतीच्या पावसामुळे नुकसान होत असल्याने भविष्यात शेती करावी की नाही, अशी द्विधा मनःस्थिती शेतकऱ्यांची झाली आहे.**
>
> **- मधुकर ठमके, शेतकरी, बाळसई-नागोठणे**

## सरत्या पावसाने पर्यटकांची तारांबळ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटन स्थळी सध्या पर्यटकांची गर्दी दिसून येत आहे. दिवाळीनिमित्त शाळांना असलेल्या सुट्टींमुळे माथेरानकडे सुट्टी एन्जॉय करण्यासाठी पर्यटकांची पावले वळली आहेत. मात्र, गेली दोन दिवस सुरु असलेल्या सरत्या पावसाने पर्यटकांच्या उत्साहावर विरजण घातले आहे. शनिवारी (दि.२५) दिवसभर पावसाची ये-जा सुरु राहिल्याने पर्यटकांची तारांबळ झालेली दिसून आली. दरवर्षी दिवाळी पर्यटन हंगाम लक्ष्मीपूजन नंतर सुरु होतो. परंतु, नोव्हेंबर महिना सुरु होणार असताना देखील सरता पाऊस अजूनही कायम आहे. त्यामुळे माथेरान सारख्या पर्यटन स्थळी पर्यटन व्यवसायावर त्याचा परिणाम दिसून येत आहे.

**भेसळयुक्त मिठाईच्या विक्रीत वाढ** | **सखोल चौकशी करून कारवाई करण्याची मागणी**

## सुपर मॉलमध्ये कालबाह्य मिठाईची विक्री?

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

दिवाळी दरम्यान मिठाई विक्रेत्यांकडून भेसळयुक्त मिठाईची विक्री करण्यात येत असल्याच्या घटनांमध्ये नेहमीच वाढ होत असते. त्यातच आता सुप्रसिद्ध मॉलमध्ये कालबाह्य मिठाईची विक्री केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. दरम्यान, कळंबोली परिसरात 'काजू कतली' मिठाई संदर्भात अशीच एक तक्रार समोर आली आहे. येथील एका ग्राहकाने आपल्या जवळच्या नातेवाईक व मित्रपरिवाराला दिवाळी भेट म्हणून दिलेल्या प्रसिद्ध कंपनीच्या काजू कतलीच्या पाकिटावर अंतिम तारीख असल्याचा ग्राहकाचा आरोप आहे.

संबंधित ग्राहकाने दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी ही काजु कतली ही मिठाई शनिवारी (दि.१८) कळंबोली येथील एका प्रसिद्ध सुपर मॉलमधून विकत घेतली होती. त्यांनी घरी आल्यानंतर पाकिटावर छापलेली तारीख तपासली असता १३ ऑक्टोबर ही मिठाई वापराची अंतिम तारीख असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी सुपर मॉलच्या संबंधित




विभागाकडे चौकशी केली आणि खरेदीचे बिलही सादर केले. या प्रकरणाची सुपर मॉल व्यवस्थापनाने तात्काळ दखल घेतली आहे. त्यांच्याकडून सांगण्यात आले की, संबंधित ग्राहकाने दाखवलेले बिल सुपर मॉलचेच आहे; परंतु, त्यावरून ती मिठाई आमच्याकडून खरेदी केल्याचे स्पष्ट होत नाही. मात्र, आम्हाला दाखवण्यात आलेली कालबाह्य झालेली मिठाई खरोखर आमच्याकडूनच दिली गेली आहे का? याची खात्री करावी लागेल, अशी प्रतिक्रिया व्यवस्थापनाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणाबाबत सामाजिक कार्यकर्ते दीपक पाटील यांनी अन्न व औषध प्रशासनाकडे ऑनलाईन तक्रार दाखल केली आहे. तसेच, या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देखील त्यांच्याकडून देण्यात आला आहे. घटनेनंतर स्थानिक ग्राहकांमध्ये खाद्यपदार्थांची तारीख तपासण्याबाबत जागरूकता वाढताना दिसत आहे. प्रशासनाने तातडीने चौकशी करून सत्य स्थिती जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## दारूमाफियांना चपराक

**रोहा पोलिसांची धडक कारवाई**

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यात अवैध दारू व्यवसायाला रोखण्यासाठी पोलिसांनी पुन्हा एकदा जोरदार धडक कारवाई करत गावठी दारू तयार करण्यासाठी लागणाऱ्या काळ्या गुळाची मोठी खेप पकडली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ६ लाख ८९ हजार ६०० रुपये किमतीचा अवैध माल जप्त केला असून, दारू माफियांना अक्षरशः हादरा बसला आहे.

मळिालेल्या माहितीनुसार, रोहा-चणेरा मार्गावरील खारी चेक पोस्ट येथे पोलिसांनी सापळा रचून पांढऱ्या रंगाची बोलेरा (एमएच-४२-बीएफ-७३९२) गाडी थांबवली. या गाडीची तपासणी केली असता त्यात गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारा काळा गूळ सापडला. रोहा पोलिसांनी



तात्काळ कारवाई करत गाडीसह काळा गुळ ताब्यात घेतला. या कारवाईत संजय म्हात्रे (२३) आणि काशिनाथ रामा लांभोरे (२६) या दोन आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यावेळी जप्त केलेल्या मालामध्ये ८९ हजार ६०० रुपये किमतीचा काळा गूळ (३५० ढेप, प्रत्येकी ८ किलो वजन, प्रति ढेप २५६ रुपये) तसेच, ६ लाख रुपये किमतीची बोलेरो पिकअप गाडी असा एकूण ६ लाख ८९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. रोहा पोलिसांच्या या दमदार आणि अचूक कारवाईमुळे गावठी दारूच्या अवैध धंद्यांना मोठा झटका बसला आहे. नागरिकांकडून या कारवाईचे भरभरून कौतुक होत असून, 'दारू माफियांना रोहा पोलिसांची चपराक' असेच सर्वत्र बोलले जात आहे.

# आर्डे रस्ता होणार खड्डेमुक्त

**● काँक्रीटीकरण करण्यास सुरुवात**



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कळंब, पाषाणे-वांगणी या रस्त्यावर आर्डे गावातून जाणाऱ्या रस्त्यावर गोरक्षनाथ मठाजवळ मोठे खड्डे पडले होते. तसेच, कळंब-वांगणी भागातील आर्डे गावाच्या परिसरात बांधकाम विभागाने रस्त्याचे काँक्रीटीकरण केलेले नाही. परिणामी पावसाचे पाणी साचल्याने रस्त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे वाहनचालकांडून त्या भागातील रस्त्याची सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी सातत्याने होत होती. संबंधित ठेकेदाराकडून रस्त्याच्या कामाला सुरूवात केली जात नसल्याने स्थानिकांमधून नाराजी व्यक्त केली जात होती. दरम्यान, समाज माध्यमांद्वारे जोरदार आवाज उठवल्यावर सार्वजनिक बांधकाम खात्याला जाग आली असून आता त्या ठिकाणी काँक्रीटीकरण कामाला सुरुवात झाली आहे.

मागील दोन वर्षांपूर्वी कळंब, पाषाणे-वांगणी रस्त्यावरील गावे असलेल्या ठिकाणी काँक्रीटीकरण आणि अन्य ठिकाणी डांबरीकरण पट्टे मारण्याचे नियोजन होते. त्यानुसार निधी देखील मंजूर झाला होता. मात्र, रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने त्यातील अनेक कामे अपूर्ण ठेवल्याने सर्वसाम ान्यांची एसटी बससेवा बंद झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणि नोकरदारांना आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे. तसेच, आर्डे गावाच्या हद्दीमधील काँक्रीटचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याकडून पूर्ण झालेले नव्हते. त्याचा फटका या भागातून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना बसत आहे.

**ठेकेदाराचे चोचले पुरविणारा रस्ता**

**कळंब, पाषाणे-वांगणी हा रस्ता बनविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने आतापर्यंत किमान २० कोटी खर्च केले आहेत. मात्र, तरीदेखील हा रस्ता अद्यापपर्यंत एकदाही अखंडपणे डांबरीकरण करून तयार होऊ शकला नाही. ठेकेदाराचे चोचले पुरविण्यासाठी कळंब-पाषाणे रस्ता असल्याची तक्रार सातत्याने वाहनचालक आणि स्थानिकांकडून होत आहे.**

येथील मठाच्या समोरच्या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले असून वेळोवेळी पडणाऱ्या पावसामुळे या रस्त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त होत आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभाग खड्डेमय रस्त्याबद्दल आणि तेथून पुढे माले गावाच्या आजूबाजूला न झालेल्या काम ाबद्दल ठेकेदारांवर कारवाई करणार का? असा प्रश्न स्थानिकांकडून विचारला होता. तसेच, याबाबत स्थानिकांकडून समाज माध्यमांवरून सार्वजनिक बांधकाम विभागाबाबत जोरदार टिका आणि तक्रारी केल्या जात होत्या. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम खात्याला जाग आली असून अनेक वर्षे अपूर्ण ठेवण्यात आलेल्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाला सुरुवात करण्यात आली आहे.

# खांब येथून पंढरपूरकडे पायी दिंडीचे प्रस्थान



। खांब । प्रतिनिधी ।

सालाबादप्रमाणे याही वर्षी खांब ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा दि.२० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. कृष्णा जाधव व नडवली यांनी ही पायी दिंडीची परंपरा चालू केली असून त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली ही पायी दिंडी नडवली-खांब येथून सोमवारी (दि.२०) सकाळी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे.या दिंडी सोहळ्यात रोहा तालुक्यासह संपुर्ण रायगड जिल्ह्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने वारकऱ्यांनी सहभाग घेऊन पायी वारीचा आनंद घेत असल्याचे सांगण्यात आले. या दिंडी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी नामदेव यादव, मारूती कोलाटकर, प्रकाश थिटे, सदानंद जाधव, कृष्णराम धनवी, एकनाथ मरवडे, गणेश जाधव, ज्ञानेश्वर लोखंडे, अजय पार्टे, शांताराम महाडिक, देविदास भोईर, नथुराम जाधव, भूषण वरखले, प्रेम चव्हाण, तुकाराम महाडिक, राम लोखंडे,होनाजी कोल्हटकर, राधिका लोखंडे, शुभांगी महाडिक, शांताबाई गायकर,सुनिता शिंदे आदी दिंडीच्या प्रमुखांसह अन्य वारकरी सदस्य मोलाचे सहकार्य करीत आहेत.




## ‘एक दिवा शहिदांसाठी’ उपक्रम

। नागोठणे । प्रतिनिधी ।

वांगणी येथील संकल्प मित्र मंडळाच्यावतीने बुधवारी (दि.२२) ‘एक दिवा शहीदांसाठी’ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच, रांगोळी व गडकिल्ले स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी रांगोळी स्पर्धेमध्ये शिद्धिका तेलंगे प्रथम , शरयू ठाकूर द्वितीय तर जान्हवी भोईर हिला उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला. तसेच, गडकिल्ले स्पर्धेत प्रथम आराध्य शिर्के, द्वितीय ऋग्वेद ठाकूर, तर उत्तेजनार्थ क्रमांक अनय तेलंगे यांना देण्यात आला.



# विनाशुल्क नोटरी कार्यालय सुरु

। रसायनी । प्रतिनिधी ।

गोरगरीब व गरजूंना शासकिय कामात अडचणी येवू नयेत यासाठी ॲड. प्रमोद मैंदर्गीकर यांनी नोटरी कार्यालय सुरु केले आहे. प्रमोद यांच्या पत्नी चित्रा मैंदर्गीकर या समाजसेवीका असून त्यांनी आदीवासी बांधव, विधवा महिला, नादार व दारीद्र रेषेखालील व्यक्ती यांना विनाशुल्क नोटरी करुन देणार असल्याचे बोलताना सांगितले. या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी माजी सभापती रमेश पाटील, माजी सरपंच रोशन राऊत, माजी सरपंच शशिकांत मुकादम, माजी सरपंच कृष्णा पारंगे, माजी उपसरपंच दत्ता खाने, माजी उपसरपंच सदगुणा पाटील, सुवर्णा मुंढे, अजित सावंत, निलेश जुनघरे व राकेश खराडे आदी उपस्थित होते. दरम्यान, मोहोपाडा येथे नोटरी कार्यालय सुरु झाल्याने रसायनी-पाताळगंगा परिसरातील नागरिकांना नोटरीसाठी खालापूर, कर्जत किंवा पनवेलला जाण्याची गरज लागणार नसून त्यांचा वेळ व पैसा देखील वाचणार आहे.

## काँग्रेस अध्यक्षपदी निखिल ढवळे

। खारेपाट । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्षपदी निखिल ढवळे यांची नुकतीच काँग्रेस भवन येथे झालेल्या कार्यक्रमात नियुक्ती करण्यात आली. यावेळी आपले मत व्यक्त करताना निखिल ढवळे म्हणाले की, अलिबाग तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात जिल्हा युवक काँग्रेसची ताकद वाढवणार आहे. तसेच, युवकांना उद्योग व्यवसाय व नोकरीच्या संधी निर्माण करण्यासाठी सहकार्य केले जाईल, असे ते म्हणाले. यावेळी काँग्रेसच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी निखिल ढवळे यांचे अभिनंदन केले आहे. तसेच, यापूर्वी जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्षपदी असलेले ॲड. प्रथमेश पाटील यांना पदावरून हटवण्यात आले असल्याचे आढावा बैठकीत सांगण्यात आले.

# मुरुडमधील खड्डे बुजवणार कधी?



■ **अंतर्गत रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य**

■ **संबंधित बांधकाम विभागाला उपाययोजना करण्याची मागणी**

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरूड तालुक्यातीली रस्त्यांची प्रचंड दयनिय अवस्था झालेली आहे. त्यातच मुरुडच्या परेश नाका ते मारुती नाका रस्त्यावरील तहसीलदार कार्यालयासमोर खड्डयांचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून हे खड्डे बुजविणार कधी? असा सवाल पर्यटक, वाहनचालक व नागरिकांतून प्रशासनाला विचारला जात आहे.

मुरूडमधील परेश नाका ते मारुती नाका मुख्य रस्त्यावर तहसीलदार कार्यालय, वनविभाग, सेतू, न्यायालय व टपाल इत्यादी महत्वाची कार्यालये असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वदर्ळ असते. या रस्त्यावर खड्डे पडले असून वेळेप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष पुरवून येथील खड्डे बुजविण्याची मागणी केली जात होती. दरम्यान, संबधित बांधकाम खात्याने या रस्त्यावरील खड्डे बुंजविले होते. परंतु, भर पावसात बंजविण्यात आलेले खड्डे किती दिवस तग धरून राहतील, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. आणि काही दिवसांतच पुन्हा परिस्थिती जैसे थेच झाली. त्यामुळे संबंधित बांधकाम खात्याने यात तातडीने लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी पर्यटक, प्रवासी व नागरिकांतून केली जात आहे.

# अस्थायिक मतदारांवर विजयाची मदार

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता काही दिवसांवर येऊन ठेपली असून इच्छुकांनी त्याचप्रमाणे अनुभवी उमेदवारांनी आतापासूनच आपल्या प्रभागातील मतदार याद्या चाळण्यास सुरुवात केली आहे. संपूर्ण माथेरानमध्ये जवळपास ४ हजारांच्या आसपास मतदार संख्या आहे. परंतु, त्यातील निम्म्याहून अधिक मतदारांची याठिकाणी घरं असून ते येथे राहत नाहीत. काहींचे फक्त नातेवाईक या ठिकाणी राहतात. तर, काही शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे फक्त मतदार यादीत समाविष्ट आहेत; परंतु, ते येथे वास्तव्यास नाहीत. ज्यांचा येथील समस्यांविषयी अथवा विकास कामांबाबत काहीएक घेणेदेणे नाही असे जवळपास दीड ते दोन हजार मतदार अस्थायिक असून त्याच मतदारांवर येथील उमेदवारांचे भवितव्य अवलंबून असल्याचे बोलले जात आहे. याच मतदारांना निवडणूक काळात गोंजारले जात असून स्थानिक उमेदवारांना अस्थायिक मतदारांसाठी नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. या अस्थायिक मतदारांशी जवळजवळ महिनाभर संपर्क साधला जातो आणि त्यांना मतदानाच्या आदल्या दिवशी स्वखर्चाने मोटार वाहन पाठवून आणले जाते. एखाद्या राजेशाही प्रमाणे यांना सोयीसुविधा पुरविल्या जात असून मतदान करून हे मतदार आपल्या प्रभागातील दोन्ही उमेदवारांकडून आयते खिसा भरून जात असतात. त्यासाठी आगामी काळात गावातील सर्वपक्षीय नेतेमंडळींनी अशा अस्थायिक मतदारांसाठी आर्थिक भुर्दंड सोसण्यापेक्षा सर्वांनी मिळून ही मतदार यादीतील नावे काढून टाकणे गरजेचे बनले आहे. निदान पुढील २०३० च्या निवडणुकीपूर्वीच अस्थायिक मतदारांची नावे काढून टाकण्यात यावी, अशी मागणी स्थानिक सुज्ञ मतदार करत आहेत.

## एमडीआर कीटकनाशक ठरले वरदान

। नेरळ । प्रतिनिधी ।

हाय रिच सीड्स कंपनीच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी एमडीआर २००१ हे कीटकनाशक उपलब्ध करून देण्यात आले होते.या कीटकनाशकाचा फायदा शेतकऱ्यांना झाला असून शेतकऱ्यांच्या शेतातील भातपीक कोणत्याही प्रकारच्या रोगराई यांचा प्रादुर्भाव झालेला नाही.दरम्यान, एमडीआर २००१ हे कीटकनाशक शेतकरी वर्गसाठी वरदान असल्याचा दावा हाय रिच सिडस कंपनीकडून करण्यात आले आहे. कंपनीचे गजानन परळकर यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना हा दावा केला असून शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन भाताच्या पिकाची पाहणी कंपनीकडून करण्यात आली आहे.

तालुक्यातील शिरसे गावांमधील प्रगतशील शेतकरी विनायक देशमुख यांच्या शेतावरती जाऊन संशोधित ध्यान एमडीआर २००१ या भात पिकाची पाहणी करण्यात आली. यावेळी कंपनीचे प्रतिनिधी गजानन परलकर, आरएसएम राहुल पवार, किसान क्रांती संघटना रायगड जिल्हाध्यक्ष उत्तम शेळके, जिल्हा संपर्कप्रमुख रामदास माळी, खरेदी-विक्री संघटना काशिनाथ ठमके, विनायक गोगटे, पंढरीनाथ दाभाडे, साधुराम पाटील, आदींसह अन्य पदाधिकारी आणि अनेक प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

## रस्त्यावर पाण्याचा मारा

। पनवेल । प्रतिनिधी ।

खांदेश्वर रेल्वे स्थानकच्या बाजूला मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरु आहे. त्यामुळे आजुबाजुच्या परिसरासह येथील रस्त्यावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना आणि प्रवासी वर्गाला त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे श्वसनाच्या विकारांसह इतर गंभीर सम स्या देखील उद्भवण्याची शक्यता आहे. दरम्यान, येथील रस्त्यावर दररोज टँकरने पाण्याचा मारा केला जातो. त्यामुळे रस्त्यावरील धुळ पाण्यासोबत निघून जात आहे. त्यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मळित आहे.

**कामठाच्या मावळ्यांचे सर्वत्र कौतुक**

**किल्ला पाहण्यासाठी शिवप्रेमींची गर्दी**

# उरणमध्ये शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती



। उरण । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून गोर-गरीब व कष्टकरी जनतेची जुलमी राजवटीतुन मुक्तता केली. आदर्श राज्य व आदर्श लोकशाही व्यवस्था कशी असते याचे उदाहरण त्यांनी जगाला दाखवून दिले. त्यामुळे महाराजांचे हे कार्य कोणीही कधीही विसरणार नाही. त्यांचा विचार व कार्याने प्रभावित झालेल्या उरण शहरातील कामठा येथील चिंतामणी अपार्टमेंटमध्ये चिंतामणी बाल युवक मंडळाने दिवाळी सणाचे औचित्य साधून कोकणातील परंपरा जपत माती व विविध साहित्याचा वापर करून शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती उभारली आहे.

उरण शहरातील कामठा येथील चिंतामणी बाल युवक मंडळातर्फे दरवर्षी दिवाळीत वेगवेगळ्या किल्ल्यांची प्रतिकृती साकारली जाते. यंदा शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती साकारली गेली आहे. त्यामुळे कामठा येथील बालगोपाळ मावळ्यांनी गड किल्ले बांधून स्वराज्य व महाराजांप्रती आपली निष्ठा दाखवली आहे. या मावळ्यांनी साकारलेला शिवनेरी किल्ला अत्यंत सुंदर व आकर्षक आहे. तसेच, सर्वांना मंत्रमुग्ध करणारा असल्याने सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी चिंतामणी बाल युवक मंडळाच्या सर्व पदाधिकारी सदस्यांचे कौतुक केले आहे. हा किल्ला बांधण्यासाठी चिंतामणी बाल युवक मंडळाचे सदस्य रोहित राठोड, इशान सामंता, आर्य म्हात्रे, शुभम पोरे, मयंक शेट्टे, सयान मन्सुरी, गणेश राठोड, क्रीयांश पोरे, अयान इब्राहिम, ओमकार गुरुव, उपासना गुरुव, रोहित निचिते, साकिब बेगवाहील मलिक यांनी विशेष मेहनत घेतली आहे. तसेच, त्यांच्या कुटुंबियांचाही त्यात महत्वाचा वाटा आहे. मंडळाने साकारलेल्या या किल्ल्याची शिवाजी महाराजांनी बांधलेल्या शिवनेरी किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती असल्याने हस किल्ला पाहण्यासाठी शिवप्रेमी व नागरिक मोठी गर्दी करीत आहेत.

## प्लास्टिक बंदी जनजागृती उपक्रम



। रसायनी । प्रतिनिधी ।

पाताळगंगा नदी, पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट आणि गावदेवी मित्र मंडळ, वाशिवली यांच्या संयुक्त विद्यमानाने दिवाळीनिमित्त किल्ले स्पर्धा तसेच रांगोळी स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम शनिवारी (दि. २५) वशिवली येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमादरम्यान पर्यावरण जनजागृतीचा संदेश देण्यासत आला. तसेच, ‘प्लास्टिक बंदी’ या मोहिमेअंतर्गत वशिवली गावात कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी आयोजन करण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत पहिला क्रमांक अनुजा पवार, दुसरा क्रमांक माया पाटील व तिसरा क्रम ांक मनस्वी जाधव यांनी पटकावला आहे. तसेच, किल्ले स्पर्धेत पहिला क्रमांक रियांस भोईर, दुसरा क्रमांक प्रज्वल पारंगे व तिसरा क्रमांक लकी चव्हाण यांनी पटकावला आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

## निवडक

### वहाळ खाडीमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील वहाळ गावाजवळील खाडीत एका ३० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. उलवा पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. या व्यक्तीचे अंदाजे वय ३० वर्षे असून उंची अंदाजे १६५ सेंमी, बांधा मध्यम, चेहरा गोल, केस काळे वाढलेले, राखाडी रंगाचा फूल बाह्यांचा बटनाचा शर्ट, काळ्या रंगाची ट्रॅकपँट, उजव्या हातावर ‘माऊली’ असे मराठीमध्ये गोंदलेले तसेच धागा व ताबीज बांधलेले, डाव्या हाताच्या अंगठ्याजवळ गोंदलेले आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास उलवा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरिक्षक शिवाजी पोफळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वाहनाच्या धडकेत तरूणाचा मृत्यू

**पनवेल :** मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील दांडफफाट्याजवळ एका वाहनाच्या धडकेतएका ३५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या व्यक्तीचा वर्ण सावळा, उंची ५.५ फुट, केस काळे, दाढी वाढलेली, बांधा मजबुत, नाक सरळ, अंगात पांढरा शर्ट व पॅन्ट, डाव्या हाताच्या पोटरीवर जुन्या उभ्या व आडव्या जखमा, उजव्या दंडावरती तोळ, कपाळावर मधोमध तीळ, उजव्या डोळ्याच्या भुवईच्या बाजूला दोन इंद्याचा जुना वन, डाव्या काखेखाली दोन तीळ आहेत. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोना प्रदिप पोपेटे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### तरुणाला लाकडी बांबूने मारहाण

**पनवेल :** शुल्लक कारणावरून लाकडी बांबूने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी अप्पू वंडाल उर्फ बाब्या याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मळािलेल्या माहितीनसुर, सलमान मोहम्मद इस्लाम सिद्दिकी हा कामोठे सेक्टर २२ येथे राहत असून तो नौपाडा येथे स्टार चिकन शॉप चालवत आहेत. दरम्यान, ते चिकन विकत असताना अप्पू वंडाल हा चिकनच्या दुकानावर चिकनची राहिलेली हड्डी मागू लागला. त्यावेळी दुकानावर गिऱ्हाईक असल्याने सलमान याने त्याला थांबण्याकरता सांगितले. त्याचा राग आल्याने त्याने दमदाटी करून शिवीगाळ केली. तसेच, लाकडी बांबूने सलमानच्या डोक्यावर मारहाण करून त्याला जखमी केले.

### वाशिवली येथून तरूणी बेपत्ता

**रसायनी :** वाशिवली येथून वीस वर्षीय तरूणी बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. नंदिनी विनोद चुनियाने (२०) ही घरातून काही वस्तू आणण्यासाठी वाशिवली बाजारात जात



असल्याचे सांगून निघून गेली ती घरी परतली नाही. याबाबत नातेवाईकांशी शोध घेतला असता ती अद्यापही मळ्िून आली नाही. ती रंगाने सावळी, अंगाने मध्यम, उंची ५ फूट, चेहरा उभट, डोळे काळे, अंगात गुलाबी रंगाचा सलवार सुट, उजव्या हातात भगवान शंकराचा धागा बांधलेला, पायात गोल्डन व गुलाबी रंगाची चप्पल असे वर्णन असून रसायनीचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोना कोमल पाटील अधिक तपास करीत आहेत. कोणाला संबंधित तरूणी आढळल्यास रसायनी पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### चेतन जाधवचे निधन

**सुकेळी :** बाळसई-रोहा येथिल चेतन दशरथ जाधव यांचे वयाच्या ४०व्या वर्षी शनिवारी (दि.२५) अल्पशा



आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच संपूर्ण बाळसई गावामध्ये शोकाकूल वातावरण पसरले. चेतन याच्या पश्चात वडील, आई, भाऊ, पत्नी, ७ वर्षांची मुलगी, चुलते असा मोठ्या संख्येने जाधव परिवार आहे. चेतन याचे दशक्रिया विधी बुधवारी (दि.३) अंबा नदी किनारी होणार आहेत. तर, उत्तरकार्य शनिवार (दि.६) राहत्या घरी बाळसई या ठिकाणी होणार असल्याचे जाधव कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे.

### कृष्णाजीराव कदम यांचे निधन



**पनवेल :** तालुक्यातील धरणा कॅम्प येथील रहिवाशी कृष्णाजीराव कदम यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.२९) भोलेनाथ मंदिर पिसार्व तलाव येथे सकाळी साडेआठ वाजता होणार आहेत. तर, उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि.३१) राहत्या घरी धरणा कॅम्प येथे होणार असल्याचे कदम कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे.. त्यांच्या पश्चात बंधू विजय कदम, मुलगा विकास कदम, विपुल कदम, तसेच पत्नी, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२६ ऑक्टोबर**

१) श्री. हेमंत लक्ष्मण गुळेकर
चेंढरे, अलिबाग,
२६-१०-१९५६

# फडणवीसांनी गृहखात्याचा राजीनामा द्यावा : सपकाळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील एका महिला डॉक्टरला पोलिसांच्या अनन्वीत छळाला कंटाळून आत्महत्या करावी लागली, ही घटना पोलीस विभागाला लाज आणणारी आहे. गृहविभागावर फडणवीस यांचे नियंत्रण नाही, फलटणची घटना गृहविभागाच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगणारी आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जनाची नाही तर मनाची तरी वाटावी आणि तात्काळ गृहमंत्रीपदाचा राजीनामा देऊन राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

सातारा जिल्ह्यातील घटनेप्रकरणी भाजपा महायुती सरकार व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी खरपूस



समाचार घेतला, ते पुढे म्हणाले की, 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य आहे. याचा अर्थ सज्जनांचे रक्षण करणे आणि दुर्जनांचा नाश करणे आहे. पण, आपल्या पोलीसांमध्ये गुंड, मवाली, बलात्कारी अशा दुर्जन प्रवृत्तींना मोकाट सोडून सज्जनांना त्रास देण्याची प्रवृत्ती बळावत आहे आणि त्याला सर्वस्वी देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार आहेत. पोलीस विभागाचा कारभार पाहून फडणवीस यांना लाज वाटली पाहिजे. पण घटना कितीही गंभीर घडली तरी फडणवीसांना त्याचे काहीही वाटत नाही. फलटणची घटना ही काही पहिली घटना नाही. स्वारगेट बस स्थानकात एसटी बसमध्ये एका महिलेवर बलात्कार झाला, त्यावेळी गृहराज्यमंत्र्यांनी केलेले विधान तर निर्लज्जपणाचा कळस होते. रावेरमध्ये केंद्रीय मंत्र्याच्या मुलीची छेड काढली, पण कारवाई होत नाही, हे पाहून मंत्र्यालाच पोलीस ठाण्यामध्ये धरणे धरावे लागले. आका, खोक्या, ही देण फडणवीस यांनी महाराष्ट्राला दिली आहे. आता ते सारवासारव करतील, तो मी नव्हेच, अशा आविर्भावात आम्ही हे केले. ते केले, अशा वल्गना करतील; पण ते जर खरेच धर्माला मानत असतील, तर फलटणच्या घटनेतील नराधमांच्या मुसक्या आवळा, असेही सपकाळ म्हणाले.

### कायदा सुव्यवस्था ढासळली

महाराष्ट्रातील वाढत्या गुन्हेगारी आणि महिला अत्याचारांच्या घटनांवरुन काँग्रेस नेत्या, माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळली आहे. हे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून फडणवीस यांचे अपयश आहे. त्यामुळे जर कायदा आणि सुव्यस्था राखणे आणि पोलिसांवर जरब ठेवता येत नसेल आणि दोन दोन पदे सांभाळणे जमत नसेल, तर फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी यशोमती ठाकूर यांनी केली आहे.

## रोह्यात दिवाळी फराळ कार्यक्रम

**। रोहा । प्रतिनिधी ।**

दिवाळीनिमित्त प्रत्येकाच्या घरी तयार करण्यात येणाऱ्या फराळचा मुस्लिम बांधवांनीदेखील आस्वाद घेता आला पाहिजे या अनुषंगाने माजी नगराध्यक्ष समीर शेडगे व उद्योजक सचिन शेडगे या बंधूंच्यावतीने दरवर्षाप्रमाणे यंदाही मोरे आळी येथे गुरुवारी सायंकाळी भाऊबीजेच्या दिवशी फराळ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन दिसून आले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून समीर शेडगे, सचिन शेडगे आणि वनश्री शेडगे यांनी उपस्थित सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत व सन्मान केला. यावेळी माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, राजू जैन, अहमद दर्जी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बैलाच्या हल्ल्याच्या कारणांची चौकशी व्हावी : ॲड. जोशी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत झालेली घटना दुर्दैवी आहे, मात्र जर हा बैल तसकरांच्या मुळे पिसाळला असेल, तर त्याचे जबाबदार गोतस्कर यांना धरायला हवेत. त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करायला हवा. पोलीस तपास करतील, अशी अपेक्षा आहे. बैलाला रेबीज झालं असेल हा निकष कोणी काढला आहे, असा आरोप ॲड. ऋषीकेश जोशी यांनी केला आहे. कर्जत येथे ऐन दिवाळी सण साजरा होत असताना कर्जत शहरात पिसाळलेल्या एका बैलाने एकाचा बळी घेतला, तर सात जणांना जखमी केले आहे. त्या पिसाळलेल्या बैलाना पकडण्यासाठी रेस्क्यू टीम तैनात करावी लागली. नंतर पकडण्यात आलेल्या बैलाला जेसीबीमध्ये भरून डंपिंग ग्राऊंडवर नेले होते. त्यावेळी नीट हाताळता न आल्याने हा बैल मृत पावला की भूल दिल्याने हा मृत पावला, हा एक वेगळा विषय आहे. पोलिसांनी मौन न बाळगता याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी जोशी यांनी केली आहे.

## ज्येष्ठ नागरिकांकडून तहसीलदारांचा सत्कार



**। उरण । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ नागरिक मंडळ मुळेखंड, तेलीपाडा, कुंभारवाडा, कोळीवाडा आणि परिसर यांच्यावतीने ज्येष्ठ नागरिक वाढदिवस समारंभाचे औचित्य साधून उरण तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांचा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, कार्याध्यक्ष अनंत पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन नुकताच सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. उद्धव कदम यांनी ज्येष्ठ नागरिक मंडळास मार्गदर्शन केले. पुढील काळात ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र, आरोग्य शिबीर घेण्यात येईल, संजय गांधी निराधार योजना याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. जीवनावश्यक वस्तू, औषधे व आर्थिक पाठबळ असेल तर जीवनाचा मार्ग सुकर होतो. माझ्याकडून आपणाला नेहमीच सहकार्य मिळेल, असे प्रतिपादन डॉ.उद्धव कदम यांनी केले. यावेळी अध्यक्ष प्रकाश पाटील, कार्यध्यक्ष अनंत पाटील, चाणजे सरपंच अजय म्हात्रे, ॲड. दत्तात्रेय नवाळे, उपाध्यक्ष अंकुश म्हात्रे, सेक्रेटरी परशुराम पाटील, खजिनदार ईश्वर म्हात्रे, सहसेकेटरी सुभाष गुरव, हरिश्चंद्र म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

## महिलेच्या पोटातून काढली चार किलोची गाठ

### डॉ. अपूर्व भट यांची यशस्वी शस्त्रक्रिया

**। रोहा । प्रतिनिधी ।**

एका वृद्ध महिलेच्या पोटातून चार किलो वजनाची गाठ काढून तिच्यावर डॉ. अपूर्व भट यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली.

एक ७५ वर्षांच्या वृद्ध महिलेचा पोटाचा आकार काही दिवसांपासून वाढत होता. त्यामुळे ती खूप हैराण झाली होती. नातेवाईकांनी उपचारासाठी तिला रोह्यातील डॉ. अपूर्व भट यांच्याकडे आणले. डॉ. अपूर्व भट यांनी महिलेच्या काही तपासण्या केल्यावर त्यांच्या पोटात खूप मोठी गाठ असल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्या महिलेवर शस्त्रक्रिया करण्यात आली. यादरम्यान पोटातील ही गाठ गर्भ पिशवीमध्ये तयार झाली होती. ही गाठ पोटात मोठे आतडे, मूत्रनलिका अशा अतिमहत्त्वाच्या अवयवांना चिकटलेली होती. चार तासांच्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर या नाजूक व महत्त्वाच्या अवयवांपासून ही गाठ सोडवून यशस्वीपणे बाहेर काढली. फारसा रक्तस्त्राव न झाल्याने वृद्ध महिला रुग्णाची प्रकृती शस्त्रक्रियेनंतर लवकर सुधारली व तिसऱ्या दिवशी रुग्णाला घरी सोडण्यात आले.

# वाढवणमधील तरुणांसाठी प्रशिक्षण कोर्स

**। उरण । प्रतिनिधी ।**

भारतातील १३ वे प्रमुख बंदर असलेल्या वाढवन पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) नेशुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एससीआय) मेरीटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (एमटीआय) सोबत 'जीपी रेटिंग प्री-सी ट्रेनिंग कोर्स' संयुक्तपणे आयोजित करण्यासाठी एक सामंजस्य करार (एमओयू) केला. या सामंजस्य करारावर जेएनपीएचे अध्यक्ष आणि व्हीपीपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उन्मेष शरद वाघ आणि एससीआयचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन बिनेश कुमार त्यागी यांनी स्वाक्षरी केली.



याप्रसंगी बोलताना उन्मेष वाघ म्हणाले, 'व्हीपीपीएल वाढवण बंदराच्या परिसरातील गावांमध्ये राहणाऱ्या स्थानिक तरुणांना कौशल्य-आधारित उपजीविकेचे प्रशिक्षण देण्यास इच्छुक आहे, ज्यामुळे त्यांना शिपिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधींचा शोध घेता येईल. एससीआय मेरीटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्यूटसोबतच्या या सहकार्याद्वारे, आम्ही या तरुणांना भारताच्या सागरी परिसंस्थेच्या वाढीस हातभार लावताना फायदेशीर सागरी कारकीर्द घडवण्याचा मार्ग तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

एससीआय-एमटीआयला जीपी रेटिंग प्री-सी ट्रेनिंग कोर्स आयोजित करण्यासाठी शिपिंग महासंचालनालयाची मान्यता आहे. प्रशिक्षण कोर्सचा कालावधी सहा महिने आहे. प्रशिक्षण कोर्स निवासी स्वरूपाचा असेल. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर आणि सीफेरर्स ट्रस्ट (बेस्ट) साठी परीक्षा मंडळाने घेतलेल्या एक्झिट परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर, बेस्टकडून प्रमाणपत्र जारी केले जाईल.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, व्हीपीपीएलने कौशल्य विकास कार्यक्रमाची नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि आगामी अभ्यासक्रम आणि संधींबद्दल माहिती प्रदान करण्यासाठी एक समर्पित चॅटबॉट सुरू केला आहे. आतापर्यंत, या कार्यक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला आहे, परिसरातील गावांमधील तरुणांकडून ३८,००० हून अधिक नोंदणी झाल्या आहेत.

## सापे-वामने रेल्वे स्टेशन समस्यांवर मंत्री भरत गोगावलेंना निवेदन

**। महाड । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील सापे-वामने रेल्वे स्थानक पुनर्निर्माणविकासनंतर प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहे. उंचीचे प्लॅटफॉर्म नसल्यामुळे प्रवाशांना चढणे-उतरणे धोकादायक झाले आहे. या प्रमुख समस्येसह स्थानकाच्या विकासासाठी सापे-वामने-नडगाव बहुविकासीय सामाजिक संस्था, महाड यांच्या पदाधिकारी यांनी राज्याचे कॅबिनेट मंत्री ना.भरत गोगावले यांना निवेदन दिले असता केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना भेटून हा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करेन, असे आश्वासन दिले आहे.



सापे-वामने रेल्वे स्टेशनच्या समस्यांबाबत निवेदन देताना संस्थेचे अध्यक्ष सुनील जाधव, सरचिटणीस अनंत जाधव, सल्लागार नामदेव घाणेकर, माजी सरपंच प्रवीण साळवी आणि अनिल किजबिले आदी संस्थेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. निवेदनात प्रवाशांच्या सोयीसाठी प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, मुख्य रस्ता ते स्थानक रस्ता तयार करणे तसेच स्थानिक ग्रामस्थ आणि गुरांच्या सुरक्षित हालचालीसाठी भुयारी मार्गाची मागणी केली आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### सकारात्मक बदल होण्याची शक्यता

**मेष :** राशीतील जातकांसाठी हा आठवडा सामान्य राहण्याची अपेक्षा असली तरी काही योगामुळे, तुम्हाला आपल्या कामात समस्या येत असेल तर, या आठवड्यात त्या दूर होऊ शकणार आहेत. या राशीतील काही जातक या कालावधीत चांगल्या पगाराची नवीन नोकरी प्राप्त करू शकतात. या राशीतील विद्यार्थ्यांना हा कालावधी शिक्षणाच्या क्षेत्रात मनासारख्या फळांची प्राप्ती करून देणारा होऊ शकतो. आपली महत्त्वाची कामे आठवड्यात सुरवातीसच करून घ्या. या कालवधीत तुम्हाला पोट आणि खांदादुखीच्या समस्या होऊ शकतात. आपले आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी तुम्हाला या कालवधीत एक तर प्रवास टाळला पाहिजे किंवा निकडीची गरज असेल तर कमीत कमी प्रवास केला पाहिजे. **महिलांना-** आपल्या कमाईमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. उधारी वसूल होऊ शकेल. थोडे फार आजारी असणाऱ्या तुमच्या आईवडिलांच्या आरोग्यातही सकारात्मक बदल होण्याची पूर्ण शक्यता आहे. नियमित सकाळी देवी स्तोत्र किंवा कुलदेवीचे नामस्मरण करा. **शुभ दिनांक -** २६,२७.

### धनप्राप्ती होण्याचा योग

**वृषभ :** वृषभ राशीतील जातकांसाठी हा आठवडा शुभ राहील. आपल्या खासगी आयुष्यात तुम्ही बरेच आनंदी राहाल त्याचा परिणाम म्हणून आपण कामात चांगले प्रदर्शन करू शकाल. तुम्ही प्रत्येक कार्यात आपले सर्वश्रेष्ठ देण्याचा या कालावधीत प्रयत्न कराल. त्यामुळे कामावर साहेबलोक आपल्यावर खुश असतील. घरातील आर्थिक स्थिती सुधारू शकते. तुम्हाला नियमित मार्गा व्यतिरिक्त आणखी धनप्राप्ती होण्याचा योग आहे त्यासाठी हातपाय हलवणे जरुरी आहे. 'दे हरी खाटल्यावरी' ही स्थिती तुमच्याबाबतीत होणार नाही. तुमचे आरोग्य या कालावधीत खूप चांगले राहील, यामुळे तुम्ही बऱ्याच चिंतांनी मुक्त व्हाल. या राशीतील विद्यार्थी विद्यार्थिनींना शिक्षणाच्या क्षेत्रात या आठवड्यात आपल्या कुटुंबाचे पूर्ण सहयोग मिळेल. फक्त मित्रांबरोबर बाहेर जाण्याचा विचार असेल तर तो टाळावा. **महिलांना-** महिलावर्गाने घरात नवीन वस्तू घेण्याचे ठरवले असेल तर या कालवधीत ते पूर्ण होऊ शकेल. पूर्ण आठवडा चांगला आहे. महत्त्वाची कामे पहिल्या पंधरा दिवसांत करून घ्या. **शुभ दिनांक -** २८,२९

### सुखद अनुभवाची प्राप्ती

**मिथुन :** राशीतील या आठवड्यात जे जातक बेरोजगार आहे, जे चांगली नोकरी मिळवण्याचे स्वप्न पाहात असतील, त्यांच्यासाठी चांगली बातमी येऊ शकते. या कालावधीत तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळण्याची शक्यता वाढली आहे. तुमच्या कमाईमध्ये वृद्धी होऊ शकते. कमाईमध्ये वृद्धी होण्याने या कालावधीत तुमचे बरेच थांबलेले व्यवहार पूर्ण होतील. कौटुंबिक जीवनात ही या कलावधीत तुम्हाला सुखद अनुभवाची प्राप्ती होईल. ह्या कालावधीत विद्यार्थी शाळा, कॉलेजच्या शिक्षणासोबत खेळात रुची घेऊ शकतात. त्याच प्रमाणे अल्प अवधीचे काम तुम्ही सुरु करू शकतात. तुमची बुद्धिमत्ता या कालावधीत उत्तम राहील. आपली अडकलेली कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न यावेळी यशस्वी होऊ शकतो. प्रेमिकांना प्रेमात यश संभवते तरीही कोणतीही जोखीम घेऊ नका. **महिलांना-** तुम्हाला किडनी आणि पोटासंबंधित काही समस्या असतील तर या कालवधीत संपूर्ण काळजी घेणे हितावह ठरेल. घरात पाहुण्यांची रेलचेल वाढणार असून, त्यांची उठबस करावी लागेल. **शुभ दिनांक -** ३०,३१

### सकारात्मक बदलाची शक्यता

**कर्क :** राशीसाठी या सप्ताहात जर आपण नोकरी धंदा शोधत असाल, तर कालावधीत त्यांना चांगल्या सॅलरीवर काम मिळू शकते. धंद्यात ही चांगले प्रस्ताव येतील, तसेच या राशीतील काही जातकांच्या घरातील कमाईमध्ये वाढ होण्याने तुमच्या आईवडिलांच्या आरोग्यातही सकारात्मक बदल होण्याची पूर्ण शक्यता आहे. यामुळे तुम्हाला घरातून या कालावधीत तुम्हाला समर्थन मिळू शकते. म्हणजे काही गोष्टींना घेऊन ते तुमच्या जोडीदारापेक्षा तुमच्यावर विश्वास दाखवू शकतात. तसेच, कंबरेच्या डाव्या बाजूला ही दुखणे असू शकते. नियमित एक ठरलेल्या वेळी महामृत्युंजय मंत्राचा १०८ वेळा जप करा. सिंह एक अग्नी तत्वाची राशी आहे म्हणून, या राशीतील जातक दृढ इच्छा शक्तीचे मालक असतात. तुम्ही या साप्ताहात जीवनात सकारात्मक परिवर्तन आणू शकतात. करिअरच्या क्षेत्रात ज्या चांगल्या बदलाची तुम्ही अपेक्षा आहे ते बदल या कालावधीत येऊ शकतात. या कारणाने घरातील बरेच खर्च तुम्ही सहजरित्या पूर्ण करू शकाल. **महिलांना-** या कालावधीत आपण बरीच राहिलेली कामे पूर्ण करू शकाल, सहलीचा बेत पूर्ण करू शकाल. **शुभदिनांक -** ३०,०१

### कार्यक्षेत्रात नवीन ओळख बनवाल

**सिंह :** या राशीसाठी चालू सप्ताह तुम्हाला आपल्या कार्यक्षेत्रात चांगले फळ देणारा ठरेल, तुम्ही शारीरिकदृष्ट्या बरेच फीट राहाल. कठीण परिश्रम आणि इमानदारीने तुम्ही या सप्ताहात आपल्या कार्यक्षेत्रात आपली नवीन ओळख बनवू शकतात. आपला ठसा उमटवू शकाल. तुमच्या कामाला पाहून तुमच्या बॉसद्वारे तुमच्या कमाईमध्ये वाढ केली जाऊ शकते, तसेच व्यावसायिकांचा व्यवसाय ही चांगला चालेल. तुमच्या आर्थिक जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती या सप्ताहात मिळेल. कौटुंबिक जीवनात तुम्ही नेहमी सुखशांतीमध्ये राहण्याची तुमची इच्छा असते. ह्या कालावधीत ती पूर्ण होऊ शकते. विद्यार्थी या कालावधीत चांगले अभ्यास करतील, निकालही यशाने भरलेला असेल. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी सूचना आहे. या कालावधीत शिक्षणाच्या क्षेत्रात यश प्राप्त करण्याची इच्छा आहे तर, तुम्हाला आपल्या मित्रांपासून थोडी दुरी ठेवली पाहिजे. त्यामुळे निकालात फरक पडेल. **महिलांना-** या राशीतील जातकांना डोळे किंवा कान संबंधित समस्या होऊ शकते. कुठल्याही प्रकारच्या आरोग्य समस्यांना दूर करण्यासाठी डॉक्टरांकडे जाणे योग्य असेल. **शुभदिनांक-** ३१,०१.

### घरात शुभकार्याचे योग

**कन्या :** या राशीसाठी या सप्ताहात घरातील लोकांमध्ये उत्तम सामंजस्य राहील. यासोबतच जीवनसाथी सोबत मिळून तुम्ही काही नवीन व्यवसाय या कालावधीत सुरु करू शकतात. या राशीतील काही विद्यार्थी यावेळी स्पर्धा परीक्षेत उत्तुंग यश मिळवू शकतात. प्रेम आणि वैवाहिक जीवन या कालावधीत दोन्ही क्षेत्रात उत्तम फळ प्राप्त होतील. तरी प्रेमात आपण कुठल्याही प्रकारचा गैरसमज करणे टाळले पाहिजे, नाहीतर नाते खराब होऊ शकते. आरोग्याबाबत या कालावधीत तुम्हाला थोडे सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. जागरण टाळणे योग्य ठरेल, तुम्हाला डोळ्याची तपासणी करावी लागेल. खरेदी-विक्रीबाबत काळजी घ्या. घरात कलशाची मांडणी करून पूजा करणे फायद्याचे ठरेल.

**महिलांना-** आपल्या कमाईत वाढ होणार आहे. घरात शुभ कार्य करण्याचे योग आहेत. अशावेळी ताण न घेता कार्य करा. तुमचे घरातील ज्येष्ठ चिंतीत होऊ शकतात. अशा वेळेत तुम्हाला त्यांच्यासोबत वेळ व्यतीत केला पाहिजे आणि त्यांच्या समस्यांना जाणून प्रयत्न केला पाहिजे. **शुभदिनांक -** २६,२८.

### आर्थिक परिस्थिती चांगली राहील

**तुळ :** प्रत्येक व्यक्तीला वाटते की, त्यांच्या करिअरचा ग्राफ लागोपाठ वर जात राहावा. तुमच्या इच्छा ही अश्याच आहे की, तुमच्या कमाईमध्ये वृद्धी व्हावी आणि तुमची नोकरी व्यवस्थित चालत राहो. या आठवड्यात ही दोन्ही अनुभवाल. सोबत हातात पैसा खुळखुळणार आहे. बचत करण्यास चांगली वेळ आहे. तसेच या राशीतील आर्थिक परिस्थिती चांगली असणार आहे. या राशीसाठी या कालावधीत बऱ्याच वेळा तुमच्या चांगल्या कामाच्या कारणाने काही लोक तुमच्या कार्यक्षेत्रात तुमचे शत्रू बनू शकतात आणि तुमच्या पाठीमागे कारस्थान रचू शकतात. म्हणून कार्यक्षेत्रात खूप विचार करून चालण्याचा सल्ला दिला जातो आहे. कौटुंबिक जीवनात जमिनीच्या वाटणीला घेऊन तुम्ही घरातील वरिष्ठ लोक आणि आपल्या भाऊ बहिणींसोबत वाद करू शकतात. तुमच्यामुळे कुटुंबात तणाव स्थिती बनू शकते. शांत राहून मार्ग काढणे हे उत्तम राहील. **महिलांना :** या राशीतील महिलांना हा कालावधी खूप चांगला राहण्याची स्थिती आहे. तरीही आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असेल. **शुभ दिनांक -**२७,२९

### कलाकारांचा सन्मान होईल

**वृश्चिक :** या आठवड्यात खूप मेहनत करावी लागेल. ज्याची अद्याप नोकरी लागलेली नाही त्यांना खास सूचना तुम्हाला या आठवड्यात मित्र आणि टीव्ही तसेच मोबाइलपासून दूर राहावे लागेल, तरच तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळू शकते. या सप्ताहात तुम्हाला तुमची उधारी परत मिळू शकते, यामुळे तुमच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल. अडकलेले पैसे वसूल करण्यास चांगला कालावधी आहे. कौटुंबिक जीवनात मोठ्या भाऊ बहिणींचे पूर्ण सहयोग मिळेल. या आठवड्यात तुम्हाला घरातील लहान सदस्यांना ही वेळ दिला पाहिजे आणि त्यांच्या सोबत खेळून आणि त्यांना वेळ देऊन जवळीकता वाढवली पाहिजे. बुधवारी कमी बोलणे फायद्याचे राहील त्या दिवशी कलेले कमी बोलणे अतिशय पैसा देणारे ठरू शकते. जर तुम्ही गुटखा, तंबाखू अशा पदार्थांचे सेवन करत असाल, तर तुम्हाला या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे वेळीच सावध होण्याचा सल्ला आपणास देण्यात येत आहे. अशा गोष्टींपासून दूर राहणेच तुमच्यासाठी उत्तम असेल. **महिलांना-** आर्थिक लाभ आहे. कलाकारांचा सन्मान होणार आहे. **शुभ दिनांक-** २८,३०

### घरातील वातावरण सुधारेल

**धनु :** राशीसाठी हा आठवडा तुम्हाला मानसिक शांती देणारा ठरणार आहे. या आठवड्यात तुम्ही आपल्या नातेवाईकांसोबत मिळून कुठल्या धार्मिक स्थळी सहल आयोजन करू शकतात. हे आयोजन तुम्हाला समाजात मान-सन्मान देईल. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा आठवडा थोडा प्रतिकूल राहू शकतो. या कालावधीत तुम्हाला शिक्षणाच्या क्षेत्रात चांगले फळ मिळण्यासाठी कठीण मेहनत करण्याची आवश्यकता आहे. वाईट संगतीपासून या कालावधीत दूर राहा आणि जितके शक्य असेल एकांतात राहून अभ्यास करा. स्पर्धा परीक्षा सोपी जावी यासाठी अभ्यासाची वेळ बदला. या राशीतील विवाहित जातकाचे जीवनसाथी कालावधीत एका मित्रासारखे त्यांच्याशी व्यवहार करू शकतात. त्यामुळे घरातील वातावरण सुधारेल. **महिलांना-** या राशीने आपल्या कामाबाबत चालढकल करू नये, नाहीतर होणारे कामही होणार नाही. त्यासाठी दिलेला वेळ व शब्द पाळा. काम सोपे होऊन जाईल, कामात ताण घेऊ नये, ॲसिडिटीचा त्रास होऊ शकतो. त्यासाठी सकाळी कोमट पाणी घ्या. **शुभदिनांक-** २९,३१

### मेहनतीचे फळ मिळेल

**मकर :** या राशीसाठी हा आठवडा तुम्हाला जगामध्ये आपली वेगळी ओळख बनवण्यासाठी कठीण मेहनत करणारा ठरेल. विचार न करता मेहनत करा. हळूहळू त्यात आपल्याला यश आलेले दिसेल. या राशीतील जातकाचे प्रेम जीवन या महिन्यात प्रतिकूल राहू शकते. त्यामुळे प्रेमिकांनी काळजी घ्यावी. कोणाच्याही नजरेत येणार नाही असे वागा. या आठवड्यात या राशीतील जातकांच्या आर्थिक पक्षात नजर टाकली असता यात सुधारणा होण्याची पूर्ण शक्यता आहे. यावेळी धार्मिक कार्यात तुमचा खर्च वाढू शकतो. तथापि, यामुळे तुम्हाला जास्त फरक पडणार नाही कारण एका बाजूने पैसा हातात येईल, याचे कारण आपण खूप जास्त वेळ काम करणार आहात त्याचा मोबदला आपल्याला मिळेल. **महिलांना-** महत्वाची बाब म्हणजे तुम्हाला आपल्या कामामध्ये काही वेळ काढून आराम नक्कीच केला पाहिजे. तरच तुमचे आरोग्य चांगले राहू शकते. आपली मेहनत वाया जाणार नाही, त्याचा निकाल आपणास पुढे दिसेल. घरात वर्दळ वाढणार आहे. विवाहितांना चांगली बातमी मिळेल. **शुभदिनांक-** ३०,०१

### भाग्याची साथ लाभेल

**कुंभ :** या राशीसाठी हा आठवडा जर तुम्ही आपली मेहनत कायम ठेवली तर तुम्हाला यश मिळवण्यात कुणी थांबवू शकणार नाही. मात्र, तुम्हाला हाच सल्ला आहे की, मेहनत करणे थांबवू नका, दुसरे महत्त्वाचे म्हणजे उधार मागू नका आणि आपल्या गरजांवर प्रतिबंध आणा. कौटुंबिक जीवनाची गोष्ट केली असता या कालावधीत तुमचे घरातील ज्येष्ठ चिंतीत होऊ शकतात. अशा वेळेत तुम्हाला त्याच्याशी गप्पा करणे चांगले ठरेल, तसेच त्यांच्यासोबत वेळ व्यतीत केला पाहिजे आणि त्यांच्या समस्यांना जाणून प्रयत्न केला पाहिजे. या आठवड्यात तुम्हाला भाग्याची पूर्ण साथ मिळेल आणि भाग्याचा बळावर तुम्ही कुठल्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवू शकतात. कलाकारांना चांगला सन्मान प्राप्त होणार आहे. नामांकन करण्यास हरकत नाही, **महिलांना-** रागापासून लांब राहा. त्यामुळे त्रास आपल्याला होऊ शकतो, शांत राहण्यात फायदा आहे. उधारी फेडण्यासाठी केलेली मेहनत वाया जाणार नाही. परिणामी आपण ऋणमुक्त व्हाल. तोंडाच्या संबंधित काही समस्यांचा सामना लागू शकतो. काळजी घ्या. **शुभ दिनांक-** २९,३०

### कुटुंबातील वातावरण चांगले राहील

**मीन :** या राशीतील लोकांना या आठवड्यात बऱ्याच क्षेत्रात आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. करिअरच्या क्षेत्रात थोडे सांभाळून चालावे लागेल. नोकरी व्यवसायात आपसात वाद होऊ शकतात. कुटुंबातील वातावरण मात्र चांगले राहील. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी थोडा विपरीत जाऊ शकतो. त्याचा परिणाम स्वरूप तुमचे अभ्यासात मन लागण्यात समस्या येऊ शकतात. मोठ्यांची मदत घेणे फायद्याचे राहील. राग बाहेर काढण्यापेक्षा मित्रांशी चर्चा करा, मार्ग निघेल. टोकाची भूमिका टाळा. महत्त्वाची कामे या आठवड्यात पुढे ढकलणे उत्तम होऊ शकेल. अतिशय गरजेचे असतील तर मध्यात करा. प्रेमात गैरसमज होऊ नये याची काळजी घ्या. खाण्या-पिण्याची यावेळी विशेष काळजी घ्यावी लागेल. सूर्यनमस्काराने आपल्या समस्याचे निराकरण होऊ शकेल. **महिलांना-** या कालवधीत आपल्या मनात अनेक गोंधळात टाकणारे विचार येण्याची शक्यता राहील. थोडा संयम ठेवा, मार्ग सापडेल. शंकराच्या देवळात जाऊन ओम नमः शिवायचा जप आपल्या समस्या सोडवू शकेल. **शुभ दिनांक -**२८,३०

# निवडक



## विवाहमिलन कार्यालयाचा शुभारंभ

**अलिबाग :** सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यात सक्रिय असलेल्या आगरी समाज संस्था अलिबाग यांच्या बहुपयोगी विवाहमिलन वधू-वर परिचय केंद्र या उपक्रमाच्या कार्यालयाचा शुभारंभ सोमवार (दि.२०) ऑक्टोबर रोजी मोरया कॉम्प्युटर्स, ब्राह्मण आळी, महावीर चौकजवळ, अलिबाग येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रमांसाठी आधार मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाधारित विवाह परिचय केंद्र सुरू करून संस्थेने आत्तापर्यंत www.vivahamilan.com या संकेतस्थळाद्वारे सर्वजातीय युवक-युवतींसाठी ऑनलाइन सेवा उपलब्ध करून दिली आहे. मात्र, अनेक पालकांना ऑनलाइन नोंदणी करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन, संस्थेचे सभासद आणि मोरया कॉम्प्युटर्सचे मालक श्री. मिलिंद पाटील यांनी त्यांच्या कार्यालयात नोंदणी मदत केंद्र सुरू करण्याचा पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या महत्वपूर्ण योगदानासाठी संस्थेच्या वतीने त्यांचे विशेष आभार मानण्यात आले. विवाहमिलन केंद्राचे व्यवस्थापन व जबाबदारी मनोहर पाटील यांनी स्वीकारली असून, दिवाळीनंतर नियमित वेळापत्रक सकाळी ११ ते दुपारी १ आणि संध्याकाळी ४ ते ६ असेल. संपर्क: मनोहर पाटील - ९४२२५९४५७१ / ८१७७८३५११८ (विवाहमिलन हेल्प लाईन) शुभारंभ सोहळ्याला संस्थेचे अध्यक्ष निलेश पाटील, उपाध्यक्ष सुनील तांबडकर, सेक्रेटरी प्रभाकर ठाकूर, राजेंद्र पाटील, अनंत म्हात्रे, प्रसाद पाटील तसेच अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, श्रेयस ठाकूर, सार्थक ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

## हसूराम पाटील यांचे निधन

**उरण :** उरण तालुक्यातील पाणजे गावातील सामाजिक कार्यकर्ते हसूराम महादेव पाटील यांचे रविवार (दि.१२) रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या अंत्यसमयी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. पाणजे ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच लखपती पाटील यांचे ते वडिल होते. हसूराम पाटील यांच्या पश्चात ३ मुले, ४ मुली व १२ नातवंडे असा त्यांच्या कुटुंब परिवार आहे.



हसूराम पाटील हे मनमिळावू, सर्वांच्या सुख दुःखात सहभागी होणारे, गोर गरिबांना नेहमी मदत करणारे व्यक्तिमत्व असल्याने त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाने पाटील आणि भोपी कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पाटील कुटुंबियांचे भेट देऊन त्यांचे सांत्वन केले.



## धगडवाडीत गो पूजा संपन्न

**सुतारवाडी :** धगडवाडी येथील निसर्गाच्या सानिध्यात कृष्णा भट यांची अमृतधारा नावाची गोशाळा आहे. या गोशाळेत सुमारे २५० गाई आहेत. या ठिकाणी दरवर्षी बली प्रतिपदेच्या दिवशी सर्व गाईंना वेगळे असे अन्न दिले जाते. यावर्षीही बली प्रतिपदेचे औचित्य साधून सुरुवातीला सर्व गायींची पूजा करण्यात आली. कृष्णा ज्योती, अनंत भट, अशोक शंकर, दिव्या शंकर, प्रकाश भट, सिद्धार्थ भट, ईश्वरी भट, राम कृष्ण, सुनिता, उदय प्रभू, देवा प्रभू, श्रिया सानवी, व्ही एन भागवत, तसेच अनेक प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते गाईंना अन्न देण्यात आले. श्री शंकराचार्य, श्री राघेश्वर भारती, यांचा काम दुधा योजनेचा संपूर्ण महाराष्ट्रात पहिला प्रकल्प यशस्वी झाला असून अमृतधारा गो-शाळा धगडवाडी, महानंदी गौलोक होस नगर कर्नाटक, गो स्वर्ग भानकुळी मठ सिद्धापूर, रामचंद्र पूर मठ होस नगर कर्नाटक, श्री राघवेंद्र गोशाळा गंगापूर, आदी. ठिकाणी गो शाळेचे उत्तम काम सुरू आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **सहारा ट्रॅव्हल्स** अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- **अलिबाग, रोहा रोड येथे** मालाड़ेगावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णतः डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/ ८४०८९३०८१५
- **अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये** ५०% भागीदार पाहिजे. (रु. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- **अलिबाग, चौल येथे** ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंट एकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- **दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे.** अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी मुलींची आवश्यकता** आहे. ज्यूस मेकिंग, रेस्टॉरंट सर्व्हिस, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- अलिबागमध्ये दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- ७९७२९३३७०, ९८२२४६१७६१
- For share market bolt operations fresh or experienced, graduate or post graduate candidates required for office in Alibag.For interview Contact- 9923750549

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याबाबत बोलणी सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कामथ ता. अलिबाग | २१ | जिरायत ०-०२-५० <br> पो.ख.क्षेत्र ०-००-८० <br> एकुण क्षेत्र ०-०३-३० | ०.२५ |
| | २८ | जिरायत ०-०३-१० <br> पो.ख.क्षेत्र ०-००-२० <br> एकुण क्षेत्र ०-०३-३० | ०.६२ |
| | १५१/१ | जिरायत ०-०२-८० <br> पो.ख.क्षेत्र ०-०१-०० <br> एकुण क्षेत्र ०-०३-८० | ०.०८ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती ह्या विद्यमान मालक १) मंजू पन्नालाल तापडिया, २) रेखा निलेश राठी, ३) नवरतन पन्नालाल तापडिया यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिथे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक- २५/१०/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२
पक्षकारांचे मान्यतेच्या स्वाक्षरी
१) मंजू पन्नालाल तापडिया,
२) रेखा निलेश राठी,
३) नवरतन पन्नालाल तापडिया

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो.वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे आंबोट, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक परशुराम हिरू सोनावळे वगैरे १० यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे.आंबोट, ता. कर्जत, जि. रायगड येथे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

| गट क्रमांक | गट उपक्रमांक | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३१ | १/ब/१ | ०-५२-३० | १-४६ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २६/१०/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री. बाळाराम बाबु घरत यांनी त्यांचे सामाईक वडिलोपार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे- बलिवरे, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड ४१०२०१ येथील वर नमुद केलेल्या जमिन मालकांचे शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ६६/७/१ | ०.६०.०० <br> पो.ख ०.२०.०० <br> एकूण ०.८०.०० | ०.४८ |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहिवाट, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख : २५/१०/२००५

सही/
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पिटल आणि आगरी समाज हॉल जवळ,
धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
मो.नं. ८३६९२१७३१३

### ग्रामपंचायत पहेल, ता. माणगाव, जि. रायगड

ग्रामपंचायत पहेल १५ व्या वित्त आयोग व इतर योजने अंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी दिनांक ०३/११/२०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सीलबंद दरपत्रक मागविण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १) | रामू सत्वे केशव कोरपे घरापर्यंत रस्ता तयार करणे | ५००००/- | ५०० | २०० |
| २) | पांडू वाघोस्कर ते यशवंत सत्वे ओहोलाला संरक्षण भिंत बांधणे | १०००००/- | १००० | २०० |
| ३) | रवी खराडे ते आप्पा खराडे गटार बांधणे | ५००००/- | ५०० | २०० |
| ४) | पहेल गाव अंतर्गत रस्ता तयार करणे | ७००००/- | ७०० | २०० |
| ५) | प्रफुल पहेलकर यांच्या घरासमोर गटार बांधणे | १०००००/- | १००० | २०० |

**अटी आणि शर्ती**

१. दरपत्रके प्रक्रियेच्या नियम व अटी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. अंतिम तारखेस दि. ०३/११/२०२५ रोजी सकाळी ११. वा नंतर आलेली दरपत्रके घेतली जाणार नाही.
३. प्राप्त दरपत्रके दि. ०४/११/२०२५ रोजी दुपारी १२ वा ग्रामपंचायत पहेल कार्यालयात उपस्थीतासक्षम सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील. नामंजूर दरपत्रकाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. व बिलाची रक्कम ग्रामपंचायतीकडील तरतुदीनुसार अदा करण्यात येईल.
४. साहित्य उत्तम दर्जाचे (आयेसाय/आयएसओ मार्क प्रमाणित) असावे, पुरवठादार जीएसटी नोंदणीकृत असावा.
५. कोणत्याही एक अथवा अनेक दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीचा राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**कु. अनिता श्रीमंत साखरे**

**सही/-**
**सरपंच**
**सौ. करिश्मा प्रसाद मांजरे**


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विवरणीत गट क्र. ४४५/२, गाव कोळगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड या विवरणाच्या जमिनीचे मालक - श्री. इक्बाल नथानी यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा सदर जमिनीविरोधात वा त्यामध्ये वा त्यावर उत्तराधिकार, गहाण, ताबा, विक्री, भेट, भाडेकरार, उप-भाडेकरार, अभिहस्तांकन, वहिवाट, विनिमय, मृत्यूपश्चात वारसा, वारसा, धारणाधिकार, प्रभार, न्यास, देखभाल, विचाराधीन विवाद, जप्ती, अनुज्ञप्ती, गहाण, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण यांचा निवाडा वा आदेश वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात

अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सहाय्यक दस्तावेजांच्या प्रतींसमवेत लिखित स्वरूपात सूचित करावे अन्यथा असा हक्क, अधिकार, लाभ, हितसंबंध, दावा व/वा मागणी काही असल्यास, ते अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

**अनुसूची**

गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील अंदाजे ०.७८.२० एच. आर. क्षेत्रफळाची गट क्र. ४४५/२ धारक जमीन व त्यावर उभ्या असलेल्या संरचना.

दिनांक : २५ ऑक्टोबर, २०२५.
सही/-
**अजय खाटलावाला**
वरिष्ठ भागीदार
लिट्ल ॲन्ड कं.
वकील व सॉलिसिटर्स
३ रा मजला, सेंट्रल बँक इमारत,
एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
ई-मेल : ak@littlecompany.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वाकस, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत, या मिळकतींचे मालक कोमल सचिन भापकर यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|
| ४७/९ | ००-२२-०० | ०.३१ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६ ऑक्टोबर २०२५

**ॲड. शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकतीपैकी अविभक्त हिस्सा आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मधुकर बाबू लोहार उर्फ भागवत यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे.खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

| गट क्रमांक | गट उपक्रमांक | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ८१ | १ | १-७३-०० यापैकी लिहुन देणार यांचा अविभक्त हिस्सा | ८-५० |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २६/१०/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमीन मिळकत आमचे अशिल सौ. प्रज्ञा सुरेंद्र गजभिये यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मंगेश विष्णु पवार यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नांव | सर्व्हे नं./हि. नं. | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मीटर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| मिरचोली | २६/६ | ०.२०.५८ | ०.२१ |

वरील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २६/१०/२०२५

सही/-
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

## ग्रामविकास परिवर्तन आघाडीतर्फे मिठाईचे वाटप

**। सोगाव । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील मापगाव विभागातील सात गावांमध्ये दिवाळीनिमित्ताने ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगाव यांच्या तर्फे सर्व ग्रामस्थांना दिवाळी सणाचा आनंद घेता यावा म्हणून दिवाळीसाठी ५ पणत्या, २ मोती साबण, २ उटणे पाकिटे असे सर्व साहित्य तसेच महिलांना भाऊबीज भेटवस्तू आणि मिठाईचे मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आले ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगाव यांचे सर्व कार्यकर्ते हे मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील सर्व समाजातील ग्रामस्थांना त्यांचे सण आनंदात साजरे करण्यासाठी प्रत्येक सणांमध्ये नेहमीच मदत करत असतात, तसेच ग्रामस्थांसाठी दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व इतर उपक्रम राबवित असतात. यावर्षी देखील त्यांनी मापगाव, बहिरोळे, बेलवली, मुशेत, चोरोंडे, सोगाव, मुनवली या सात गावांतील सर्व ग्रामस्थांना घरोघरी जाऊन दिवाळीचे साहित्य वाटप करण्यात आले. या प्रसंगी ग्रामविकास परिवर्तन आघाडीचे सर्वच कार्यकर्ते मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that I am investigating the title of :-

Mr. Anupam A. Lakhina, Adult, having residence at Mumbai/Gurgaon the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property"), free from all encumbrances and claims.

All person (s), claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub- tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/decree/ judgment of court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address, within fourteen (14) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

All that piece and parcel of the (i) agricultural land bearing Gat Number & Upavibhag 473/1 admeasuring 0.39.26 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab/ Fallow Land admeasuring 0.00.08 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessed to Rs. 11.99 Ps. and (ii) non-agricultural land bearing Gat Number & Upavibhag 473 / 2 admeasuring 10.42.00 R. Sq. Mtrs., Assessed to Rs. 104.20 Ps. along with three (3) structures bearing Group Grampanchayat Kihim House Nos. 89, 90 and 288 constructed on aforesaid lands, all being, lying and situate at Village Kamath, Taluka Alibag and District Raigad.

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad, 402 201.

### जाहीर नोटीस

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, **मौजे वर्णे** येथील वर्णे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आ-प्र) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १४ | ६ ह | १-६३-०० <br> पोटखराबा ०-२१-०० | १.२९ |

अशी मिळकत महसुल अधिकार अभिलेखात **गौतम उदयकुकार दिवाडकर, शिल्पा अजय वर्दे, शर्मिला विनय तेलंग** यांच्या नावे दाखल असुन त्यांच्या मालकीची व कब्जेवहीवटीची आहे.

सदर मालकांनी सदरहू मिळकतीचे स्वामित्व तपासण्यासाठी तसेच सदरहू मिळकत सर्व ऋणबोजेमुक्त व बोझेविरहीत असल्यासंबंधीची खातरजमा करण्यासाठी सदरची जाहीर नोटीस देण्याची विनंती केली आहे व त्या अनुषंगाने सदरहू मिळकती संबंधी खुलासेवार जाहीर नोटीस देत आहे.

तरी सदरहू मिळकतींवर वा तिच्या भागावर गहाण दान, बक्षिस, फरोक्तखत, तारण, कुळवहिवाट, भाडेकरूपणाचे हक्क, विश्वस्त, वारसा, देखभाल, लीज, वहिवाट, पोटगी, साठेकरार, बयाणा वा तत्सम हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे लेखी पुरावे व कागदपत्रासह स्वरुप विशद करून खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कुणाकडून काही लेखी हरकत, तक्रार व दावा न आल्यास मिळकत निर्वेध व बोजेविरहित आहे असे समजण्यात येईल व मागून आलेल्या तक्रारी, दावा व हरकती या रद्दबातल आहेत असे समजण्यात येतील.

**दिनांक :** २६.१०.२०२५

**कार्यालय :** १०५, पहिला मजला विकास हाईट्स,
संतोषीमाता रोड, कल्याण (प), जि.ठाणे,
टेलिफोन नं.(ऑफिस) २३२७४४७, २३२२५२६

सही/-
**शैलेंद्र द. जल्लावार**
(वकील)




## राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात नवे आशेचे किरण दिसतील. कौटुंबिक पर्यटनाचा आनंद मिळेल. आर्थिक उत्कर्ष होईल.
- **वृषभ** : महत्त्वाचे करार मार्गी लागतील. घरगुती व्यवसायात उत्कर्ष होईल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **मिथुन** : मनाची एकाग्रता गरजेची ठरेल. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. चैनीवर अधिक खर्च होईल.
- **कर्क** : कौटुंबिक सुख–समाधान लाभेल. आर्थिक व्यवहारात लाभ होईल. आप्त–स्वकीयांच्या भेटी होतील.
- **सिंह** : कलाकारांना उत्तम संधी लाभतील. पत–प्रतिष्ठा वाढेल. कर्ज प्रकरणात महत्त्वाचा दिलासा मिळेल.
- **कन्या** : उत्साहवर्धक घटना घडतील. व्यवसायातील अडचणींवर मात कराल. विद्यार्थ्यांना सुयश लाभेल.
- **तूळ** : विचारपूर्वक बोलणं हिताचं ठरेल. कामातील सातत्य कायम ठेवावं. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल.
- **वृश्चिक** : दिलासादायक घटना घडतील. कुटुंबात तुमचा शब्द अंतिम राहील. अनपेक्षित धनलाभ संभवतो.
- **धनु** : विवाहातील अडचणी दूर होतील. सणानिमित्त उत्साहाने खरेदी कराल. व्यवसायात उलाढाल वाढेल.
- **मकर** : आतापर्यंतच्या प्रयत्नांचे अपेक्षित परिणाम दिसतील. नव्या विचारांना चालना मिळेल. चिंता नसावी.
- **कुंभ** : स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. वाहन खरेदीचे योग आहेत. खर्च वाढला तरी प्राप्तीही वाढेल.
- **मीन** : उगाच चिंता करू नका. उत्कर्षाच्या संधी लाभणार आहेत. थोरामोठ्यांचा सहवास महत्त्वाचा ठरेल.

## ब्युटी मंत्रा
## झटपट तयार व्हायचं तर...

पायांचं सौंदर्य उजवळण्यासाठी तुम्ही मध आणि साखर यांचं मिश्रण तयार करून लावू शकता. हे मिश्रण पायांवर नीट लावा. पाच मिनिटं पायांना नीट मसाज करा. यानंतर पाय धुवून टाका. यामुळे पाय छान उजळलेले दिसतील.

* लिपस्टिकऐवजी तुम्ही लिप क्रेय्रॉन्सचा वापर करू शकता. यामुळे तुम्हाला इंन्स्टंट मेकअप लूक मिळेल. मेकअप करायला फार वेळ नसेल तर चेहऱ्याला सीसी क्रीम लावता येईल. यानंतर आय लायनर, ब्लश आणि काजळ लावता येईल. भुवयांचा मेकअप करायला विसरू नका. आयब्रो पेन्सिल नसेल तर क्लियर मस्काराचा वापर करता येईल.

* तुम्ही झटपट हेअरस्टाईल करू शकता. चेहऱ्याला शोभून दिसणारी हेअर स्टाईल करा. टॉप नॉट, मॅसी ब्रेड, ब्रेडेड बन, हाफ अप हाफ डाउन या हेअरस्टाईल्स पटकन करता येतील आणि छानही दिसतील.

## २६ ऑक्टोबर — दिनविशेष

- १९३० : सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ डॉ. वाल्डेमर हाफकीन यांचे निधन
- १९३७ : संगीतकार आणि गायक हृदयनाथ मंगेशकर यांचा जन्म.
- १९५४ : चित्रपट अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांचा जन्म.
- १९७४ : अभिनेत्री रविना टंडन यांचा जन्म.
- १९८५ : प्रसिद्ध अभिनेत्री असिन यांचा जन्म.
- २०१३ : ‘नॅक’ने केलेल्या फेरमुल्यांकनात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ‘अ’ दर्जाचे मानांकन मिळवले.

## महत्त्वपूर्ण काही...
## विजेला रस्ता मिळाला

कडाडणाऱ्या विजेविषयी संशोधक करताना संशोधक बेंजामिन फ्रँकलिन याने केलेल्या प्रयोगाची माहिती आपण घेत आहोत. या प्रयोगात त्याने पतंग उडवला तेव्हा दोरीवरचे धागे उभे राहत असलेले दिसताच त्यानं बोट किल्लीच्या जवळ आणलं. त्याबरोबर जाणवण्याइतका जोरदार विजेचा झटका बसला. यावरुन ढग विद्युतभारित असल्याचं स्पष्ट झालं. आता त्याने घर्षणजन्य विद्युत साठवता येणारी लेडन बरणी किल्लीजवळ आणली. लेडन बरणीच्या विद्युतवाहक पत्र्याला किल्ली टेकवल्याबरोबर ती बरणी विद्युतभारित झाली. या प्रयोगावरून फ्रँकलिननं दाखवून दिलं, की आभाळात कडाडणारी वीज आणि प्रयोगशाळेतील घर्षणजन्य विद्युत एकच आहे. त्यानंतर १७५३ मध्ये त्याने विद्युतनिवारकाची कल्पना मांडली. इमारतीवर धातूचा दांडा बसवायचा, त्याला धातूची पट्टी जोडायची आणि पट्टीचं दुसरं टोक जमिनीच्या संपर्कात आणायचं. यामुळे त्या वास्तूवर जमा होणाऱ्या विद्युतभाराला सुलभ वाहक मार्ग मिळेल आणि वीज जमिनीत विसर्जित होईल. पुढे या विद्युतनिवारकाचा वापर सर्वत्र सुरू झाला.

## पंचांग

**रविवार, २६ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक शु. ५, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : ज्येष्ठा, योग : शोभन, सूर्योदय ६.३९, सूर्यास्त ६.०६

## फॉरवर्डस

**उन्हें चिराग़ बुझाकर भीं आजमाओ क़भी...**

**जो रोशनी में चमकतें दिखायीं देतें हैं...!**

## आरोग्यमंत्र
## स्वत:ला पण वेळ द्यावा

महिलांच्या आयुष्यात तीन टप्पे महत्त्वाचे असतात. पहिला टप्पा म्हणजे ती वयात येते व ज्या वेळी तिला पाळी येते. दुसरा टप्पा ती जेव्हा गरोदर असते आणि बाळाला जन्म देते. तर तिसरा टप्पा म्हणजे रजोनिवृतीचा. या प्रत्येक टप्प्यावर तिच्या शरीरात बदल होत असतात. हे तिन्ही टप्पे पार करताना जर प्रत्येक स्त्रीने योगासने केली तर तिचे आयुष्य वेदनारहित जाईल. महिला सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत मुलांच्या, पतीच्या आणि इतर कौटुंबिक सदस्यांच्या सेवेत स्वतःला गुंतवून घेतात. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष होतं आणि मग वाढत्या वयानुसार आरोग्याच्या समस्या भेडसावतात. अंगावर दुखणं काढल्यामुळं समस्या अजून जटिल होत जातात. कधी कधी कुटुंबाच्या देखभालीत कमी पडल्याने मानसिक ताणतणाव वाढत जातो आणि स्वभाव चिडचिडा होतो. मग मनात एकटेपणाची भावना वाढून लागते डिप्रेशन येतं. या सर्वांमधून बाहेर पडण्यासाठी महिलांनी थोडं स्वार्थी व्हायला हवं. त्यांनी स्वत:ला पण वेळ द्यावा. पुरेसा व्यायाम करावा, चालणं, योग करणं इत्यादी व्यायाम प्रकार करावेत. रोज अर्धा एक तास योग केल्यानं तर महिलांच्या अनेक समस्या दूर होऊ शकतात. वाढते वजन नियंत्रणात येतं. शुगर, गर्भाशयाच्या तक्रारीवर योग वरदान आहे. अनेक आजार हार्मोन्स इन बॅलन्सने सुरू होतात. योग केल्यामुळे सर्व समस्या कमी होऊ शकतात.



## वाचा तर खरं

जगाची लोकसंख्या कमालीची वाढत आहे. लोकसंख्येच्या या उद्रेकाने अनेक धोके समोर दिसत आहेत. मात्र सजीवांमधील फक्त माणसांचीच संख्या वाढत आहे असं नाही. अन्य सजीवांच्या संख्येतही वेगाने वाढ होताना दिसत आहे. अलिकडेच पार पडलेल्या एका सर्वेक्षणात संपूर्ण जगात मनुष्यांची संख्या आहे तेवढे कीटक फक्त एक चौरस मैल भागात राहतात. विविध प्रकारच्या कीटकांची संख्याही वाढत आहे. सहाजिकच त्यामुळे निसर्गचक्रात बाधा उत्पन्न होण्याचा धोका आहे.

## करिअरवाटा
## गेम सुधारा, कारकिर्द घडवा

आपल्या देशात खेळसंस्कृती होती. मुलं भरपूर खेळायचे. पण मधल्या काळात ‘खेलोगे, कुदोगे तो होगे खराब, पढोगे, लिखोगे तो बनोगे नवाब’ असा चुकीचा मंत्र जपला गेला. काही प्रमाणात आजही हे चित्र कायम आहे. परंतु आता खेळात उज्वल कारकिर्द घडवता येते, हे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळेच खेळाची आवड असेल तर गेम सुधारण्याकडे लक्ष द्यायला हवं. अशा वेळी कमी गुण, प्रख्यात कॉलेजमध्ये प्रवेश न मिळणं, भल्यामोठ्या पगाराची नोकरी न मिळणं, आदी किंतु–परंतु बाजुला सारावेत. कारण सध्या खेळाडूंना रेड कार्पेट वेलकम आहे. बहुतेक सर्व शिक्षणसंस्थांमध्ये खेळाडूंसाठी स्पेशल कोटा असतो. तेव्हा खेळ निवडला तर आवडत्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार नाही ही व्यर्थ भीती नको. सध्या कॉलेजमध्ये स्पोर्ट्स टीम बनवताना मोठी मेहनत घ्यावी लागते. खेळाडूंची संख्या कमी झाल्याने हॉकी, क्रिकेट, खो–खो, बास्केट बॉल आदी खेळांच्या टीम बनत शकत नाहीत. खेळाडू विद्यार्थ्यांचं विशेष कौतुक होतं. त्यांनी आपल्या कॉलेजकडून खेळावं यासाठी आग्रह होतो. हे सर्व लक्षात घेता सुरुवातीपासूनच खेळाचा सराव ठेवावा. कारण त्यातूनही कारकिर्दही बहरेल.



## खेचाखेची
## वेडा आहेस का?

एक माणूस व्हाईट हाऊसला फोन करतो आणि म्हणतो, मला अमेरिकेचा पुढचा राष्ट्राध्यक्ष व्हायचं आहे.

**ऑपरेटर:** तू वेडा आहेस का?
.
.
.
**माणूस:** ते गरजेचं आहे का?

## वेगळं काही

अदिस अबाबामधल्या सेंट पीटर्स रूग्णालयातल्या डॉक्टरांनी ३३ वर्षांच्या मनोरूग्ण व्यक्तीच्या पोटातून खिळे आणि इतर धारधार वस्तू बाहेर काढल्या. त्याच्या पोटात तब्बल १२२ खिळे होते. यातले काही खिळे १० सेंमीपेक्षाही लांब होते. यासोबतच चार पिना, टूथपिक आणि काचेचे तुकडेही बाहेर काढण्यात आले. रूग्णाने या वस्तू गिळल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. जवळपास अडीच तास ही शस्त्रक्रिया सुरू होती. गेल्या दहा वर्षांपासून तो मनोरूग्ण होता आणि दोन वर्षांपासून त्याने औषधं घेणंही बंद केलं होतं. याच कारणामुळे त्याने खिळे गिळायला सुरूवात केली असावी असा डॉक्टरांचा अंदाज आहे. पण त्याच्या पोटाला फारशी इजा झाली नाही.

## फॅशन पॅशन
## मॅक्सी ड्रेस खरेदी करताना...

सणासुदीच्या काळात प्रावरणाचे नानाविध प्रकार खरेदी केले जातात. मॅक्सी ड्रेस हा त्यातला एक आहे. सध्या मॅक्सी ड्रेसची चलती दिसत आहे. मात्र हा ड्रेस योग्य पद्धतीने कॅरी करावा. त्यासाठी काही टिप्स फॉलो करायला हव्या.

* साईड किंवा फ्रंट स्लिटवाल्या मॅक्सी ड्रेसची निवड करा. यात पाय थोडे उघडे दिसत असले तरी तुम्ही जास्त उंच दिसाल. * मॅक्सी ड्रेससोबत छानसा बेल्ट कॅरी करता येईल. बेल्टमुळे तुमचं शरीर सम भागात विभागलं जाईल. यामुळे तुम्ही उंच दिसू शकता. बुटक्या युवतींनी हायवेस्ट बेल्टची निवड करावी. * मॅक्सी ड्रेस खूप घट्ट नसावा तसंच ढगळही नसावा. ढगळ कपड्यांमुळे तुम्ही जास्त बुटक्या दिसता. * कमी उंचीच्या मुलींनी उभ्या रेघा असणाऱ्या मॅक्सी ड्रेसची निवड करायला हवी. प्रिंटेड मॅक्सी ड्रेस घ्यायचा असेल तर छोट्या प्रिंट्सची निवड करावी. * तुम्हाला गडद रंगाच्या किंवा ब्लॅक अँड व्हाईट मॅक्सी ड्रेसचीही निवड करता येईल. हे कॉंबिनेशन खूप छान दिसतं. काळा, रॉयल ब्लू, ग्रीन, रेड असे गडद रंगाचे मॅक्सी ड्रेस विशेष खुलून दिसतात.



## सुडोकू २०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३ | २ | | | | | ९ | |
| ७ | | | | ८ | ३ | | | |
| १ | | | | ९ | | २ | ३ | |
| | | | | | ७ | १ | | ५ |
| ६ | | | | | | | | ४ |
| ४ | | ८ | ६ | | | | | |
| | ६ | ७ | | २ | | | | ९ |
| | | | ३ | १ | | | | ६ |
| | १ | | | | | ८ | ५ | ३ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३ | १ | २ | ४ | ९ | ७ | ६ | ५ |
| ७ | ९ | ६ | ५ | १ | ८ | ३ | ४ | २ |
| २ | ५ | ४ | ७ | ३ | ६ | ८ | १ | ९ |
| ४ | ७ | २ | ६ | ५ | ३ | १ | ९ | ८ |
| ६ | १ | ९ | ४ | ८ | ७ | २ | ५ | ३ |
| ५ | ८ | ३ | ९ | २ | १ | ४ | ७ | ६ |
| ९ | २ | ८ | १ | ७ | ५ | ६ | ३ | ४ |
| १ | ४ | ५ | ३ | ६ | २ | ९ | ८ | ७ |
| ३ | ६ | ७ | ८ | ९ | ४ | ५ | २ | १ |

## शब्दकोडे क्रमांक २०



**आडवे शब्द :-**
१) पहिला धडा, प्रारंभ
३) नकटे नाक
७) मुलगी
९) धनी
११) भयंकर
१२) विहीर
१३) बारीज कीस
१५) बटबट
१६) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
१७) मूळ आधार
१८) गती, प्रेरणा
२०) नवरसातील दयेचा रस
२२) बाण फेकणे
२४) त्रास, बडबड
२६) गमन, जाणे
२७) उबदार पांघरुण ( इं.)
२९) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
३०) संगीतातील छेडलेली लकेर
३१) चामखीळ
३४) प्रहार, धाव
३५) फुलातून काढलेला सुगंधी द्रव
३६) वाढलेला व्याप
३९) एक शिकारी पक्षी
४०) एकही शब्द
४१) कौसल्यापुत्र
४२) नाविकदल
४४) व्यापारी फायदा
४६) पाठवणी
४७) शरीर
४९) दहावे नक्षत्र
५०) सैन्य
५२) प्रसिद्धी, गप्पाचे आगर
५५) (भुताने ) पछाडणे
५७) कावळा
५८) दिवस
६०) शीतल
६१) धूर जाण्यासाठी केलेला मार्ग
६३) अखंड
६४) बोटाच्या टोकावरील आवरण
६५) धैर्यवान स्त्री
६६) बातमी
६७) समशेर

**उभे शब्द :-**
१) म्हणीतील जीवानिशी मारणारा
२) मातुल
३) सरसकट
४) दारावरील खुणेचा आवाज
५) दारु
६) सैन्याची तुकडी
७) अखेर
८) येरझार, कष्ट, त्रास
१०) बारीक केस
१२) विमान
१४) सामान
१७) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
१९) श्वसनेंद्रिय
२१) होकार
२३) वाळवंट
२५) आघात, टोमणा
२६) फसवणूक
२८) अदृष्य
३१) माजलेला
३२) मंत्रीमंडळ
३३) मेहरबानी
३४) पातळ खांब
३५) जरतर(हिं.)
३६) एक मराठी महिना
३७) सोन्याचा कस
३८) उंट हाकणारा
३९) विषमच्या विरुद्ध
४१) संतापी
४३) परत आलेला
४५) पक्ष्यांना फाशात अडकवून शिकार करणारा
४७) खर्चात कपात
४८) प्रहर
५१) अपशकून
५३) एक धान्य
५४) नवीन आलेला
५५) मुलींचा फ्रॉक
५६) वर्षाव, भडीमार
५९) शर्करा
६१) संन्यासाची आगटी
६२) देठ
६४) नूतन.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# सामाजिक बहिष्कारातून फायदा काय



**प्रमोद जाधव**

भेदभाव आणि वंचितेचा परिणाम म्हणजेच सामाजिक बहिष्कार अर्थात वाळीत टाकणे होय. हा प्रकार एखाद्या समुहासाठी न्याय देणारा वाटतो. परंतु त्याचा परिणाम वाळीत टाकलेल्या व्यक्ती बरोबरच कुटुंबावर काय होतो. हे त्या व्यक्तीला आणि कुटूंबालाच माहित. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील सहभाग त्यांचा नाकारला जातो. इच्छा असतानादेखील ते कुटुंब सहभागी होऊ शकत नाही. आवड असताना धार्मिक, सामाजिक, उपक्रमांसह अन्य संस्कार विधीमध्ये सहभाग घेऊ शकत नाही. सामाजिक बहिष्काराचे स्वरूप समाजासाठी फारच हानीकारक आहे. जिल्ह्यात आजही गाव गावकी घेऊन एखाद्याचा न्याय निवाडा केला जातो. पंच म्हणून समाजात एक वेगळा सन्मान त्यांचा राखला जातो. गावकीच्या माध्यमातून अनेकांना न्यायही मिळाले आहे. एखाद्याच्या पाठीशी गावकी कायमदेखील राहिली आहे. हे चित्र जिल्ह्यात समाधानकारक असले, तरी काही ठिकाणी जिल्ह्यात गावकीच्या माध्यमातून वाळीत टाकले जात असल्याचे चित्र भयावह आहे.

मागील काही वर्षापूर्वी जिल्ह्यात वाळीत टाकण्याच्या घटना प्रचंड वाढल्या होत्या. आमंत्रण न करणे, पत्रिकेत नाव न टाकणे, गावकीतील प्रमुखाला विश्वासात घेऊन त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून एखाद्या व्यक्तीला टारगेट करणे. त्यांच्याविरोधात षडयंत्र तयार करणे. समाजातील कोणत्याही सदस्याला धार्मिक आणि सामाजिक रितीरिवाज, रूढी यांचे पालन करण्यास अथवा सामाजिक कार्यक्रम, मेळावा, सभा आणि मिरवणुका यांमध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध किंवा अडथळा करणे.

समाजातील विवाह, अंत्यविधी किंवा इतर धार्मिक समारंभ अन्य विधी संस्कार करण्यास प्रतिबंध करणे. दंड आकारणे, दंड न भरल्यास गावकीच्या सार्वजनिक उपक्रमात त्यांना सहभागी न करणे हे प्रकार प्रचंड वाढले होते.

रायगड जिल्ह्यामध्ये सामाजिक बहिष्काराच्या घटना मागील काही वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणात झाल्या होत्या. समाजातून वगळण्याचे प्रकार वाढले होते. सामाजिक, आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास दिला जात होता. सामाजिक बहिष्काराची ४७ प्रकरणे झाली होती. सामाजिक बहिष्कार म्हणजे एखाद्या व्यक्तीला किंवा गटाला समाजातील इतर सदस्यांपासून मुद्दामून वेगळे करणे,त्यांना अनेक हक्क, संधी आणि संसाधनांपासून वंचित ठेवणे. ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे, जी व्यक्ती आणि समाजाच्या विकासाला अडथळा आणते. सामाजिक बहिष्कारामुळे व्यक्तीच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो.यामुळे समाजात असमानता आणि अशांतता निर्माण होते. कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा धोका कायमच असतो.

अशा प्रकारच्या बहिष्कारांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने सामाजिक बहिष्कार आणि त्यापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी आणि निवारण) अधिनियम २०१६ हा कायदा अस्तित्वात आणला. २०१७ मध्ये हा कायदा लागू करण्यात आला. जिल्ह्यातून वाळीत प्रकरण हद्दपार करण्यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली होती. जनजागृतीपर उपक्रम राबविले जात होते. वाळीत टाकणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते. यानंतर काही प्रमाणात हे प्रकरणांवर अंकुश राहिला. मात्र, रायगड जिल्ह्यात पुन्हा सामाजिक बहिष्कार प्रकरणाने डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. अलिबाग तालुक्यातील खैरवाडी येथे सामाजिक बहिष्काराचे प्रकरण मागील पंधरा दिवसांपूर्वी समोर आले. रेवदंडा पोलिसांनी याबाबत दखल घेत गुन्हा दाखल केला होता. मांत्रिकांच्या बतावणीवर विश्वास ठेवीत मुलाच्या मृत्यूस कारणीभूत असल्याच्या संशयावरून गावकी भरवून एका कुटुंबास वाळीत टाकण्यात आले. याप्रकरणी तक्रारीनुसार रेवदंडा पोलिसांनी रामराज–खैरवाडी येथील ३३ जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. या घटनेनंतर रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चोरढे येथे देखील वाळीत तथा सामाजिक बहिष्काराचे प्रकरण समोर आले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चोरढे गावातील एका समाजातील ग्रामस्थांनी गावातील जुन्या हनुमान मंदिराच्या जागेत नवीन मंदिराचे बांधकाम केले. त्या मंदिरालगत असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची जागा बदलून १३ फेब्रुवारी २०२५मध्ये ते स्मारक फिर्यादीच्या मालकीच्या जागेत तसेच येण्या–जाण्याच्या मुख्य रस्त्यात वाहनांना अडथळा निर्माण होईल, अशा ठिकाणी बांधले. ही जागा बदलावी, यासाठी आगरी समाजाच्या पंचांबरोबरच शासनाकडे तक्रार केली होती. तसेच बांधकामाविरोधात दिवाणी न्यायालयात दावा दाखल केली होता. या गोष्टीचा राग धरून चोरढे गावातील एका समाजाच्या पंच मंडळाचे पदाधिकारी, सदस्य अशा एकूण २३ जणांनी एप्रिल ते मे या कालावधीत गावातील हनुमान मंदिरात गावकीची सभा घेतली. या सभेत फिर्यादीच्या हजेरीचा पुकार न करणे, पाठविलेली वार्षिक वर्गणी न स्वीकारणे, फिर्यादीच्या कुटुंबाशी कोणीही संबंध न ठेवणे, पीडित कुटुंबाशी संबंध ठेवणाऱ्यास प्रत्येकी रूपये पाच हजार रूपये दंड ठेवण्यात येईल, असा ठराव करून सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात पुन्हा २३ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेवदंडा पोलिसांची कारवाई कौतूकास्पद असली, तरी अशा प्रकारच्या घटना घडू नये, समाजातील एकी अबाधित राहवी, माणुस प्रत्येकजण जगला पाहिजे, या दृष्टीने पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

रायगड जिल्हा आधुनिकतेच्या वाटेवर असताना अशा प्रकारच्या घटना घडणे म्हणजे आजही भुरसटलेल्या विचारांची मक्तेदारी समाजात आहे. ही मक्तेदारी थोपविण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. समाजात काही मंडळी वैयक्तीक कारणावरून वाळीत टाकल्याच्या तक्रारी करतात. त्यांना ही रोखणे गरजेचे आहे. समाजातील एखादी चुकीची परंपरा असल्यास त्यांना रोखणे योग्य आहे. परंतु समाजातील एखादा व्यक्ती वाळीतचे कारण सांगून गुन्हा दाखल करण्यावर भर देत असेल, तर त्यांनाही आवरायला पाहिजे. एखाद्या विशिष्ट कारणावरून गुन्ह्यात अडकविण्याचे प्रकारही समाजात घडत असतात. जिल्ह्यात समाजिक बहिष्काराविरोधात समाज प्रबोधन करीत असताना समाजातील मंडळींना वेठीस धरून त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करणाऱ्यांचे समाज प्रबोध करण्याची नितांत गरज आहे. तरच समाजात माणुस म्हणून प्रत्येकजण जगणार आहे. अन्यथा किरकोळ कारणावरून वाद होऊन माणुस म्हणून जगण्याच्या मार्गालाच अडकाठी येण्याची शक्यता नाकारात येत नाही. **

*पूर्वी गावात चावडीवर बसून प्रत्येकजण आपले दुःख, सुख व्यक्त करीत. एकमेकांची विचारपूस करीत. त्यामुळे एक वेगळा जिव्हाळा प्रत्येक व्यक्तीमध्ये निर्माण होता. सण, उत्सव एकत्र साजरे करून आनंदमय वातावरण निर्माण करण्याची परंपरा होती. मात्र भुरसटलेल्या विचाराच्या काही मंडळींनी आनंदाला आणि एकीला खोडा घातल्याचे चित्र आजही समाजात आहे. वाळीत टाकल्यावर त्या पिडीत व्यक्तीसह त्यांच्या कुटुंबावर काय परिणाम होतो, हे माणूस म्हणून प्रत्येकाने बघितल्यास समाजात एक वेगळा अमुलाग्र बदल होईल अशी अपेक्षा आहे. सामाजिक बहिष्काराच्या माध्यमातून दुसऱ्याला सोयी सुविधांपासून वंचित ठेवण्याचा आनंद काही व्यक्तींना वाटत असला, तरी त्याचा मानसिक व शारिरीक त्रास त्या कुटुंबाला किती होतो, हे पाहणे देखील गरजेचे आहे. त्यामुळे सामाजिक बहिष्कारातून फायदा काय हे कायमच वाळीत टाकताना बघणे गरजेचे आहे. संत, महापूरुषांच्या विचाराने प्रेरित झालेल्या जिल्ह्यात वाळीत तथा सामाजिक बहिष्काराच्या घटनांना खतपाणी घालणाऱ्यांना आवरणे आवश्यक आहे.*



# मुंबई शिवडी परिसरातील दीपोत्सवाला सत्तर वर्षाचा गौरवशाली इतिहास



**निलेश साठे**

मुंबई शिवडी पश्चिम परिसरात असलेल्या बाबुराव शेलार मार्गावरील शिवडी दक्षिण विभाग सार्वजनिक दीपोत्सव मंडळाला यंदा ७० वर्षे पूर्ण झाले असून त्यानिमित्ताने मंडळातर्फे सप्तदशक वर्षपूर्ती म्हणून साजरे करण्यात येत आहे. दीपोत्सव साजरे करणारे मुंबईतील हे पहिले मंडळ असून वर्ष –१९५६ सालापासून सुरू झालेला हा दीपोत्सव आजतागायत अखंडपणे सुरू आहे. दिवाळीनिमित्त साजरा केल्या जाणाऱ्या या दीपोत्सव निमित्ताने शिवडी दक्षिण विभाग सार्वजनिक दीपोत्सव मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये लक्ष्मी मातेची प्राणप्रतिष्ठापना, सत्यनारायण महापूजा, लक्ष्मी मातेची मिरवणूक व विसर्जन सोहळा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सोबतच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे सुद्धा आयोजन केले जाते. यावर्षी सोमवार दिनांक–२० ऑक्टोबर २०२५ रोजी देवीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. शनिवार दिनांक–२५ ऑक्टोबर २०२५ रोजी सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. रविवार दिनांक–२६ ऑक्टोबर २०२५ रोजी भव्य मिरवणूक काढून देवीचे विसर्जन केले जाणार आहे. संपूर्ण आठवडाभर चालणाऱ्या या सोहळ्याला शिवडी आणि आजूबाजूच्या परिसरातील हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. मराठी बहुल असलेल्या या शिवडी विभागात अनेक जाती धर्माचे लोक गुण्या गोविंदाने राहत आहेत. सर्व जाती धर्मातील लोक येथे देवीच्या दर्शनासाठी येतात. येथे प्राणप्रतिष्ठित केलेल्या लक्ष्मी मातेला ''शिवडीची राजलक्ष्मी'' नावाने प्रसिद्धी प्राप्त झालेली आहे. त्यामुळे शिवडीची राजलक्ष्मी याच नावाने इथे देवीला ओळखले जाते. शिवडी दक्षिण विभाग सार्वजनिक दीपोत्सव मंडळातर्फे अनेक सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रम राबवले जातात.

तसेच या भव्य सोहळ्याचे आयोजन भिकूमाळी चाळ क्रमांक ५,६ व ७ तसेच खिमजी विश्राम चाळ , गणेश नारायण आणि माने पत्राचाळ यांच्यातर्फे दरवर्षी केले जाते.भावी पिढीला आपल्या संस्कृती आणि परंपरेचा विसर होऊ नये आणि ही परंपरा पुढे अखंडपणे चालत राहावी यासाठी येथील कार्यकर्त्यांचा हा प्रयत्न व सहभाग सतत असणार आहे असे शिवडी दक्षिण विभाग सार्वजनिक दीपोत्सव मंडळाचे अध्यक्ष श्री.प्रशांत कायंदेकर, इतर मुख्य कार्यकर्तेही सांगतात. आणि ते खरेही आहे. आजच्या पिढीला आपले सण आपले उत्सव आपल्या परंपरा आपली संस्कृती यांच जतन करायला यायलाच हवं. नव्याचा ध्यास घेताना जुनं विसरता कामा नये. शिवडी दक्षिण विभाग सार्वजनिक दीपोत्सव मंडळाने सदर उत्सवास सुरू करून नव्या पिढीसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. आणि हा दीपोत्सव संपूर्ण मुंबईतच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभर आणि संपूर्ण देशभर साजरा केला जावा. त्यामुळे समाजामध्ये एकता निर्माण होऊन सर्वधर्मीय लोक गुण्या गोविंदाने आणि आपुलकीने राहू लागतील. **

# 'अष्टप्रहराची वेळ आणि जीवन'

**अष्टप्रहर म्हणजे २४ तासांचे आठ भागांमध्ये केलेले विभाजन, जिथे प्रत्येक प्रहर साधारणपणे ३ तासांचा असतो. यात दिवसाचे चार प्रहर पूर्वान्ह, मध्यान्ह, अपराह्न, सायंकाळ आणि रात्रीचे चार प्रहर (प्रदोष, निशिथ, त्रियामा, उषा) यांचा समावेश होतो. हिंदू धर्मात, प्रत्येक प्रहराचे स्वतःचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे आणि त्यानुसार पूजाविधी केले जातात. एक प्रहर हा तीन तासांचा असतो. पुर्ण दिवसभरात ८ प्रहर होतात.**




**धनंजय शेटये**

अष्टौप्रहर काळाची आराधना, जीवनाचा नाद आहे. भारतीय संस्कृती ही केवळ प्राचीन नाही, तर ती अनादि–अनंत ज्ञानाचा अखंड झरा आहे. या संस्कृतीने काळालाही अध्यात्माचा स्पर्श दिला, प्रत्येक क्षणाला अर्थ दिला. दिवसाचे आणि रात्रीचे विभाजन केवळ गणित नव्हते, तर ते जीवनाचे एक सुंदर संगीत होते. त्या संगीताचा ताल म्हणजे 'अष्टौप्रहर'

'अष्टौप्रहर' हा शब्द जसा उच्चारला, तसा त्याचा अर्थही अद्भुत. 'अष्ट' म्हणजे आठ आणि 'प्रहर' म्हणजे काळाचा एक भाग. म्हणजेच दिवस आणि रात्र मिळून आठ प्रहर काळाचे आठ सुवर्णकल्लोळ!

प्राचीन भारतात वेळ मोजण्यासाठी घड्याळ नव्हते, पण ऋषींच्या अनुभवाने काळाच्या ठोक्यांची अचूक जाण होती. २४ तासांच्या दिवसाला त्यांनी आठ प्रहरांमध्ये विभागले प्रत्येक प्रहर सुमारे तीन तासांचा. ही विभागणी केवळ कालगणना नव्हती, ती होती जीवनशैलीचे शास्त्र, आरोग्याचे रहस्य आणि ध्यानाचे सूत्र.

प्रत्येक प्रहराची स्वतःची लय असते, त्याचा आपल्यावर परिणामही वेगळा असतो. पहाटेच्या ब्राह्ममुहूर्तातील प्रहरात ध्यान, साधना, नामस्लउरण सर्वोत्तम असतो. मध्यान्हाचा प्रहर कर्माचा, संध्याकाळीचा प्रहर भजनाचा, तर रात्रीचा प्रहर विश्रांतीचा. अशा या प्रहरांतून जीवनाची शिस्त, आरोग्य आणि आनंद एकत्र येतात.

धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून 'अष्टौप्रहर नामस्मरण' ही परंपरा अत्यंत मंगल मानली जाते. अखंड चोवीस तास भगवानाचे नाम घेतले जाते, भजन–कीर्तनाने वातावरण भारलेले असते. प्रत्येक प्रहर वेगवेगळ्या भक्तमंडळांकडून सांभाळला जातो एक अखंड भक्ति–धारा, एक अविरत आध्यात्मिक प्रवाह संपूर्ण गावात किंवा मंदिरात वाहू लागतो. त्या निनादातून केवळ शब्द नव्हे, तर दैवी स्पंदन निर्माण होते.

भगवान श्रीकृष्ण, विष्णू, महादेव यांच्या उपासनेत 'अष्टप्रहर भजन' हे विशेष पूजनीय मानले जाते. 'अष्टप्रहर हरिनाम सप्ताह' वा 'नामयज्ञ' हे केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, ते समाजातील एकात्मतेचे आणि आध्यात्मिक उन्नतीचे प्रतीक आहेत.

पण या सर्वामागे केवळ श्रद्धा नाही, वैज्ञानिक सत्यही दडलेले आहे. प्रत्येक तीन तासांनी आपल्या शरीरात जैविक घड्याळात बदल घडतो झोप, पचन, मनःस्थिती आणि ऊर्जेचे प्रवाह हे सर्व त्या प्रहरानुसार बदलतात. त्यामुळे योग्य वेळी आहार, ध्यान, काम आणि विश्रांती केल्यास मन–शरीर यांच्यातील संतुलन टिकून राहते.

खरं तर, 'अष्टौप्रहर' म्हणजे फक्त वेळेची विभागणी नाही, तर जीवनाचे नियोजन, साधनेचा आराखडा आणि संतुलनाचा मंत्र आहे.

हीच ती भारतीय संस्कृतीची देणं. जी काळालाही पूजते, कारण तिला माहीत आहे की काळ म्हणजेच परमेश्वराचा नाद!

अष्टौप्रहर काळाची आराधना, जीवनाची साधना, आणि संतुलित अस्तित्वाचा दिव्य मंत्र.आपल्या जीवनात वेळ कुणासाठीच कधी थांबत नाही. आपणाला वेळेसोबतच चालावे लागते.'थांबला तो संपला' असे म्हटले जाते. 'ती वेळच तशी होती'. 'वेळेपुढे कोणाचेच चालत नाही.' 'काळ आला होता पण वेळ आली नव्हती' अशा प्रकारची अनेक वाक्य आपल्या नित्य नियमाच्या व्यवहारात कानी पडत असतात. मग ही 'वेळ' म्हणजे तरी नेमकं काय? 'काळ' हा शब्द जसा वेळेसाठी वापरला जातो तसा तो 'मृत्यू' चा दूत यासाठीही वापरला जातो. दिवसाचे २४ तासच असतात. ते कधीच बदलता येत नाहीत.

खरंतर आपल्या आयुष्यातील 'वेळ' आपण कशी वापरायची हे ज्याचं त्याचं गणित असतं.आपण नोकरी करतो म्हणजे नेमकं काय तर आपली 'वेळ' तास आपण दुसऱ्याला विकतो. आपण आपल्या आयुष्यात संपूर्ण आयुष्यभर जरी नोकरी केली तरी फक्त नोकरी करुन आपण अंबानी, टाटा, अडानी, बिर्ला यांसारखे श्रीमंत होऊ शकत नाही. मग हे लोक एवढे श्रीमंत कसे होतात? तर हे मोठमोठे उद्योगपती आपल्या कामगारांची 'वेळ' खरेदी करतात. ज्यावेळी आपण दुसऱ्याची 'वेळ' खरेदी करु त्याचवेळी आपण बलाढ्य श्रीमंत होऊ शकतो. दुसऱ्यायाची 'वेळ' खरेदी करण्याचे कौशल्य म्हणजे उद्योगशिलता होय. **

# विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा सर्वांचा लाडका 'लक्ष्या'

**श्याम ठाणेदार**

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज – सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म ७१ वर्षापुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला.

टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला. त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली.

लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी.



या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबा, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी



चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला.

ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने.

या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले.

आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन! **

## अभिनव प्रवास नोंदी

# अमेरिका डायरी

**पुस्तक परीक्षण**

**प्रा. शाम जोगळेकर**

मो. ९२७३३४३१७७




अमेरिका डायरी, या प्रसाद घाणेकर यांच्या पुस्तकाच्या सुरुवातीला त्यांच्या ताईचे मनोगत वाचावयास मिळते. त्यानुसार २००१ मध्ये आरती, मयुरेश अमेरिकेला गेले आणि हळूहळू तेथेच स्थायिक झाले. तेव्हापासून घाणेकर परिवारातील सर्वांना ती तिकडे बोलवत होती. परंतु प्रसाद यांना अमेरिकेला जाणे, दीर्घकाळ शक्य झाले नाही. त्यानंतर वयाची साठ वर्षे पूर्ण होताना, प्रसाद यांना अमेरिकावारी करता आली. प्रसाद यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्ताने, ही पुस्तक भेट त्यांच्या कुटुंबीयांनी प्रसाद यांना दिली.

''आरतीकडे जाण्याची गोष्ट'' मध्ये प्रसाद घाणेकर यांनी या प्रवास दौऱ्याची पार्श्वभूमी सांगितली आहे. प्रसाद यांचे वडील पोस्टात नोकरीला असताना, दर तीन-चार वर्षांनी त्यांची बदली होत असे. मालवण तालुक्यातील चौके या गावी राहत असताना, १९७६ मध्ये प्रसाद यांचे काका, पद्माकर त्यांच्या कुटुंबीयांसह मुंबईहून आले होते. त्यावेळी काकांचा मुलगा, सचिन सात वर्षांचा, त्याची धाकटी बहीण आरती साडेतीन, तर प्रसाद १४ वर्षांचे होते. त्यावेळी सर्व चुलत भावंडांचा घनिष्ठ संबंध निर्माण झाला, जो नंतर जीवनभर टिकून राहिला. सचिन आणि आरती या भावंडांनी प्रसाद यांना 'दादा' म्हणून कायमचे स्वीकारले होते. त्यानंतरही या चुलत भावंडांच्या वेळोवेळी भेटी होत होत्या. त्यामुळे परस्परांची स्वभाव वैशिष्ट्ये एकमेकांना चांगली माहीत झाली होती. आरतीच्या आग्रहामुळे शेवटी ८ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रसाद विमानास्थ झाले आणि दुपारी एक वाजता आरतीकडे अमेरिकेत सुखरूप पोहोचले. अमेरिकेतील सहा महिन्यांच्या मुक्कामात, प्रसाद यांनी लिहिलेली डायरी या पुस्तकाद्वारे वाचावयास मिळते.

पहिला आठवडा आरतीच्या प्रशस्त घरी, सर्वांशी भरपूर गप्पागोष्टींबरोबरच घराची आणि आजूबाजूची माहिती करून घेण्यात गेला. नंतर प्रसाद, आर्य (जन्म २००६), या भाच्यासह त्याच्या शाळेत जाऊन आले. त्या दिवशी प्रेमदिन (व्हॅलेंटाईन-डे) होता. मामाला छोट्या आर्यने आपली, कोणीही व्हॅलेंटाईन नसल्याचे, विचारताच सांगितले होते. पहिल्या आठवड्यापासूनच प्रसाद यांचे वाचन, दूरचित्रवाणीवर चित्रपट व मालिका पाहणे, सकाळ-संध्याकाळ सोयीनुसार चालणे सुरू झाले होते. वेळोवेळी घरी आणि बाहेर अमेरिकेतील जीवनशैलीचा अनुभव त्यांना येत होता. सुरुवातीच्या काळातच आरतीचे घर साफ करण्यासाठी येणारी बाई, सकाळी ठरलेल्या वेळेच्या पाच मिनिटे आधीच, स्वतःच्या गाडीतून हजर झाली होती. झटपट प्रशासकीय होणाऱ्या कामांचा अनुभवही वेळोवेळी प्रसाद यांना घेता आला. आरतीची सख्खी मैत्रीण सुजाता आणि संजय अहेर यांची भेट झाली. अन्य मित्र सुपर्णा आणि अजय गोडबोले यांचीही ओळख झाली. संजय अहेर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील, परंतु अमेरिकेत आल्यावर बांधकाम व्यवसायासाठी आवश्यक परीक्षा देऊन आता त्यामध्ये यशस्वीपणे व्यवसाय करत आहेत. आरती आणि मयूर ज्या बँकेत नोकरी करतात, त्या बँकेच्या मुख्य कार्यालयाची, बहुमजली इमारत प्रसाद यांना दुरून पाहता आली. आरतीच्या बागेत अधूनम धून प्रसाद काम करत होते, कधी मयुरेश बरोबर तर कधी आर्य बरोबर.

अमेरिकेतील नागरी सुविधांचा दर्जा आणि त्यामधील शिस्त अनुकरणीय आहे, असे विविध अनुभवांतून त्यांना सतत जाणवले. या सर्व काळात प्रसाद यांचे इंग्रजी साहित्याचे वाचन आणि दूरचित्रवाणीवर कार्यक्रम पाहणे सुरूच होते. पु.ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षात प्रसाद यांनी, आपल्या आवडत्या लेखकाला आदरांजली म्हणून 'डॉ.रा.चिं.ढेरे स्मृतिजागर' हा वैयक्तिक प्रकल्प आखला आणि पूर्ण केला. त्यानंतर याचा पहिला झूम कार्यक्रम, २० मार्च रोजी सकाळी अकरा वाजता अमेरिकेतही झाला. हा ५८ वा कार्यक्रम होता. त्यासाठी विविध सुजाण श्रोते या कार्यक्रमात समाविष्ट झाले होते. त्यानंतरही प्रसाद यांनी अभिवाचनाचे विविध कार्यक्रम अमेरिकेतील आपल्या मुक्कामात वेळोवेळी सादर केले होते. त्यांच्या या अभिवाचनाच्या, अलिबाग तालुक्यातील, कोमसापच्या एका कार्यक्रमात, काही वर्षांपूर्वी प्रस्तुत लेखकालाही आनंद घेता आला होता. त्यावेळी, प्रसाद यांची प्रत्यक्ष ओळखही झाली होती. प्रसाद विविध मैदानी सामने टीव्हीवर पाहण्याचा आनंद अमेरिकेतील मुक्कामी घेत होते.२७ मार्चच्या संध्याकाळी, त्यांनी एका अमेरिकी कुटुंबातील घरी बास्केटबॉल सामन्याचा आनंद, त्यांच्याबरोबर घेतला. प्रसाद यांनी, त्यांच्या व्यक्तिमत्वांची, घराची आणि त्यांच्या भवतालच्या भव्य परिसराची नेमकेपणाने नोंद केली आहे.

३१ मार्च रोजी नाथ पै यांच्या चरित्राचा, प्रसाद यांनी केलेल्या अभिवाचनाचा शेवटचा भाग, आकाशवाणी सिंधुदुर्ग केंद्राने प्रसारित केला. प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या सौजन्याने प्रसाद यांना हे प्रसारण अमेरिकेत सुस्पष्ट ऐकता आले. नाथ पै यांची पत्नी क्रिस्टल, सलग दहा वर्षे आपल्या व्हिएन्नातील आईला दर आठवड्याला पत्र लिहीत असे. त्यामुळेच प्रसाद यांना ही दैनंदिनी लिहिण्याची प्रेरणा मिळाली. प्रसाद यांनी ३० एप्रिलला एका चित्रपट महोत्सवाच्या समारोपाच्या कार्यक्रमाचा उल्लेख केला आहे. त्यामधून अशाच प्रकारच्या कार्यक्रमात, आपल्याकडे होणारी कंटाळवाणी भाषणे, लांबणारे सत्कार आणि तेथील नेमकेपणाने साजरे होणारे महोत्सव यांची उत्तम तुलना होते. मे महिन्यात प्रसाद यांनी आरतीसह अमेरिकेतील विविध सुप्रसिद्ध स्थळांना भेटी दिल्या. त्यांचा सविस्तर वृत्तांत, त्यांच्या नेमक्या प्रतिक्रियांसह वाचावयास मिळतो. जूनमध्ये प्रसाद यांनी ग्रँड कॅनियनचे दर्शन घेतले. तेथे निसर्गाच्या विराट रूपाची आणि मानवाच्या क्षुद्रत्वाची जाणीव होते. ही दरी पाच हजार फूट खोल आहे. प्रत्येक पातळीवरील खडकांचे वय वेगवेगळे आहे. या दरीचा शोध लावणारा पॉवेल हा हिंदू संस्कृतीचा अभ्यासक होता. त्यामुळे सर्वात तळातील स्तराचे नाव त्याने ''विष्णू खडक'' असे ठेवले. हा स्तर १८४०-१६८० दशलक्ष वर्षांपूर्वी निर्माण झाला. तर सगळ्यात वरचा स्तर २७० दशलक्ष वर्षांपूर्वीचा आहे आणि साठ हजार वर्षांपूर्वी माणूस पृथ्वीवर अवतरला.

उन्हाळी सुट्टीत सोळा वर्षांच्या आर्यने, एका उपहारगृहात नोकरी करून आपले पहिले उत्पन्न मिळविले. त्याच हॉटेलमध्ये प्रसादसह सर्व गेले असताना, त्याला काम करताना पाहून सर्वांनाच त्याचे कौतुक वाटले. अमेरिकेत स्थायिक झालेली मराठी कुटुंबे तेथील श्रमप्रतिष्ठेचा असा आदर करतात. सुजाता आणि संजय अहेर या कुटुंबाविषयी प्रसाद यांनी सविस्तरपणे लिहिले आहे. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वांची, उत्तम ओळख होते. सहा महिन्यांच्या काळातील, अमेरिकेतील आपले विविध अनुभव, दर आठवड्याला प्रसाद यांनी नोंदविले आहेत. त्यांच्या वाचक गटातील विविध सदस्यांनी हे सर्व अनुभव त्यावेळीच वाचले होते.

पुस्तकाच्या शेवटी असणाऱ्या विविध, विपुल, सुंदर, रंगीत छायाचित्रांमुळे हे पुस्तक वाचनीय आणि प्रेक्षणीय ठरते. डायरी लेखन, हे आता इतिहासजमा झाले आहे .परंतु प्रसाद यांच्याप्रमाणे, सर्वांनी आपले प्रवासातील अनुभव वेळोवेळी लिहून ठेवले, तर ते कालांतराने सर्वांनाच उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतील. ''अमेरिका डायरी'' प्रसाद घाणेकर यांची स्वभाव वैशिष्ट्येही स्पष्ट करते. प्रसाद यांच्या कुटुंबातील, कौटुंबिक आपुलकीची जाणीव होऊन, त्याचे भावनिक महत्त्वही जाणवते. **

**पुस्तकाचे नाव :अमेरिका डायरी**
**लेखक : प्रसाद घाणेकर**
**प्रकाशक : वंदना करंबेळकर**
**प्रकाशन : १४ ऑगस्ट २०२२**
**मुखपृष्ठ, मलपृष्ठ व अन्य छायाचित्रे, आरती घाणेकर व प्रसाद घाणेकर. पृष्ठे : १०८+१४(रंगीत छायाचित्रे)**
**(हे पुस्तक खाजगी वितरणासाठी असल्याने, बाजारात विक्रीसाठी उपलब्ध नाही.)**

# ही मानसिकता काय सांगते?

***एखादी घटना घडून जाते, पण तिचे पडसाद अनेक प्रकारे उमटत राहतात. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू असताना एका वकिलाने 'सनातन का अपमान, नही सहेगा हिंदुस्थान' अशी घोषणा देत सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकून मारल्याच्या घटनेने चांगलेच तरंग उमटले. संसदीय लोकशाहीमध्ये सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांवर वकिलच बूट फेकून मारतो ही घटनाच मती गुंग करणारी ठरली.***

**डॉ. सुकृत खांडेकर**

गेला काही काळ राजकारण्यांच्या भूमिका तपासणारी एक घटना सातत्याने गाजत राहिली. या घटनेने देशवासियांच्या मानसिकतेवर चांगलाच प्रकाश टाकला. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू असताना एका वकिलाने 'सनातन का अपमान, नही सहेगा हिंदुस्थान' अशी घोषणा देत सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकून मारला, या घटनेने सर्वसामान्य माणूसही हादरला. सर्वच राजकीय पक्षांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला. देशात चोहोबाजूने संताप प्रकटला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सरन्यायाधीश गवई यांना फोन करून या घटनेचा निषेध केला. पण संसदीय लोकशाहीत देशाच्या न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च मंदिर असलेल्या सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांवर वकिलच बुट फेकून मारतो ही घटनाच मती गुंग करणारी ठरली. न्यायव्यवस्थेत सरन्यायाधीश हे सर्वोच्च स्थान आहे. त्या वकिलाची त्यांच्यावर बुट फेकून मारण्याची हिम्मत झालीच कशी? सनातन धर्माचा अपमान झाला म्हणून आपण सरन्यायाधीशांचा बदला घेण्याचा प्रयत्न केला, हे त्या वकिलाला देशाला दाखवून द्यायचे होते की कोणाला खूश करण्यासाठी त्याने हे कृत्य केले?

सरन्यायाधीशांवर बुट फेकू पाहणारा वकिल ७२ वर्षाचा आहे. त्याला पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले, पण अटक करून कोठडीत का रवानगी केली नाही? म्हणे, त्याच्या विरोधात कोणी तक्रार दिली नाही. त्याची चौकशी करून पोलिसांनी घरी सोडले. सर्वसामान्य माणूस सर्वोच्च न्यायालयात सहज प्रवेश करू शकत नाही. सरन्यायाधीशांपर्यंत पोहोचू शकत नाही. न्यायव्यवस्थेला सुरक्षा व्यवस्थेने घेरलेले असते. पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री यांच्या दौऱ्यात रस्त्यावर कोणी काळे झेंडे दाखवले तरी पोलीस त्याची उचलबांगडी करतात, त्याला पोलिसी हिसका दाखवतात आणि त्याच्यावर गुन्हे नोंदवले जातात. मग सरन्यायाधीशांवर भर कोर्टात बुट फेकणारे ज्येष्ठ वकील राकेश किशोर यांची सहज सुटका कशी होऊ शकते? ते म्हणतात, या कृत्याचा आपल्याला मुळीच पश्चात्ताप होत नाही, आपण तुरूंगात जाण्यास तयार आहोत. मी माफी मागणार नाही. दैवी शक्तीने हे काम माझ्याकडून करवून घेतले हा वकिल दिल्लीतील मयुर विहार भागामध्ये राहतो. मध्य प्रदेशमधील खजुराहोच्या जावरी मंदिरात भगवान विष्णुंची मूर्ती आहे. तिच्या जीर्णोध्दारासंदर्भात केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू होती. हा विषय न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात नसून पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत आहे, असे सरन्यायाधीश आणि न्या. विनोद चंद्रन यांनी वकिलाना वारंवार सांगून पाहिले, पण भगवान विष्णुचे नाव घेत तो वकिल आपले म्हणणे सतत मांडत राहीला. भगवान विष्णुचा भक्त असेल तर त्या गृहस्थाने




त्यांची प्रार्थना करावी; ते स्वत: त्याबाबत समर्थ आहेत, अशा आशयाचे भाष्य यावेळी सरन्यायाधीशांनी केले. पण विश्व हिंदु परिषदेने त्यांच्या वक्तव्याला आक्षेप घेतला आणि न्यायधीशांनी आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे, असे म्हटले. सरन्यायाधीश गवई यांनीही तत्काळ आपण सर्व धर्मांचा विश्वास करतो व सर्व धर्मांचा आदर करतो असे म्हटले. खरे तर हा विषय इथेच संपायला हवा होता. पण सरन्यायाधीशांच्या वक्तव्याने हिंदु धर्माच्या श्रध्देची थट्टा केल्याच्या प्रतिक्रियांचा पाऊस सोशल मिडियावर पडला. या घटनेनंतर स्वत: गवई यांनी म्हटले की, अशा प्रकारामुळे विचलीत होऊ नका, आम्ही विचलीत झालेलो नाही. अशा गोष्टींनी मला काही फरक पडत नाही. त्यानंतर घडलेल्या बुटफेकीच्या घटनेनंतर पंतप्रधान मोदींनी गवई यांना लगेच फोन केला आणि आपल्या समाजात अशा कृत्यांना समाजात स्थान नाही; हे निषेधार्ह आहे असे म्हणत सरन्यायाधीशांनी दाखवलेला संयम कौतुकास्पद आहे.

भुषण गवई हे देशाचे दुसरे दलित सरन्यायाधीश आहेत. त्यांच्याअगोदर बालकृष्णन हे दलित सरन्यायाधीश होते. न्यायसंस्थेच्या सर्वोच्च पदावर असलेले गवई हे दलित आहेत म्हणून काही घटकांना रूचलेले नाही का? देशात किंवा राज्यात सत्तेच्या परिघात असलेल्या प्रमुख नेत्यावर असा हल्ला झाला असता तर भाजपाने देशभर रान पेटवले असते. पण सरन्यायाधीश गवईंवर सर्वोच्च न्यायालयात बूट फेकल्याची घटना दुपारी घडली असताना सर्व राजकीय पक्षांकडून या घटनेचा निषेध केला गेला, पण भाजपाचे सर्व राष्ट्रीय नेते आणि प्रवक्ते मात्र गप्प बसले. रात्री साडेआठ वाजता पंतप्रधानांनी ट्वीट करून या घटनेचा निषेध नोंदवला. तोपर्यंत सोशल मिडियावर गवईंवर बुट फेकणाऱ्या वकिलाचे कौतुक चालू होते, वृत्तवाहिन्यांवर त्याच्या मुलाखती सुरु होत्या. सरन्यायाधीशांनी सनातन धर्माची बदनामी केली, असा सोशल मिडियावर धुव्वाधार प्रचार केला गेला, त्यावर सरकारने काही कारवाई न केल्याचे आश्चर्य वाटते. आपल्यावर झालेल्या हल्ल्याचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मुळीच भांडवल केले नाही. उलट, त्यांनी त्या वकिलाचा बूट पोलिसांच्या स्वाधीन केला. पोलिसांनीही त्या वकिलाला चार तास ताब्यात ठेऊन त्याच्यावर गुन्हाही नोंदवला नाही. उलट, त्याला चहा-नाष्टा, जेवण दिले आणि बूट परत करून त्याला घरी सोडून दिले.

हे सर्व पोलिसांनी कुणाच्या सुचनेवरून केले? म्हणे, त्या वकिलाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाने तक्रार नोंदवली नाही म्हणून कारवाई केली नाही. दिल्लीचे पोलीस हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात, म्हणूनच त्या वकिलाला राजकीय संरक्षण मिळाले का? सरन्यायाधीशांनी त्यांच्या पदाला आणि प्रतिष्ठेला साजेशी सामंजस्याची आणि शांततेची भूमिका घेतली तर त्यांच्यावर बूट फेकणाऱ्या वकिलाला व्हिआयपी वागणूक दिली गेली. न्यायालयात अजून आरक्षण सुरू झालेले नाही. सरन्यायाधीश गवई हे आपल्या गुणवत्तेवर सरन्यायाधीशपदी पोहोचले आहेत. त्यांचे वडील रा. सु. गवई हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र विधान परिषदेत अनेक वर्षे सभापती होते. संसदेत खासदार होते. बिहार आणि केरळचे राज्यपाल होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर त्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला. स्वत: भूषण गवई सर्व धर्मांच्या मंदिरात आणि धार्मिक स्थळांमधे जातात. सर्व धर्माचा आदर करतात, असे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनीच म्हटले आहे. मग त्यांच्याकडून सनातन धर्माचा अपमान झाला, अशी आवई उठवून त्याचे भांडवल का करण्यात आले? सोशल मिडियावर तर सरन्यायाधीशांवर टीका करण्याचा अतिरेक झाला. त्यांची इम्पिचमेंट करा, राजीनामा द्या असे संदेश व्हायरल झाले. गवई हे हिंदुविरोधी आहेत, असाही प्रचार झाला. मग पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका का घेत राहिले?

ज्येष्ठ विधिज्ञ कबिल सिब्बल यांनी गवईंवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करणारे पहिले ट्वीट केले. त्यानंतर इतरांना जाग आली. गवईंनी मॉरिशसमध्ये बोलताना भारतात कायद्याचे राज्य आहे, बुलडोझरचे नाही असे म्हटले होते. त्यावरूनही सोशल मिडियावर गवई हे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या विरोधात आहेत, असा प्रचार केला गेला होता. सरन्यायाधीश म्हणून गवईंनी शपथ घेतल्यावर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या वकिलांचे गवईंनी 'जय भीम' म्हणन स्वागत केले होते, याची आठवण आज करून दिली जात आहे. हे म्हणणे काहीजणांना रूचले नाही का? कर्नाटकचे भाजपाचे नेते आणि बंगळुरूचे माजी पोलीस आयुक्त भास्कर राव यांनी तर बूट फेकणाऱ्या वकिलाचे कौतुक केले. वकिलाने जी भूमिका घेतली, त्यानुसार वागले. त्यांच्या धाडसाचे कौतुक करतो, असे त्यांनी म्हटले आहे. राहुल गांधी, सोनिया गांधी, शरद पवार, अरविंद केजरीवाल, मायावती, केरळचे मुख्यमंत्री विजयन अशा विविध नेत्यांनी सरन्यायाधीशांवर झालेल्या हल्ल्याचा कडक शब्दात निषेध केला. गवईंच्या दिशेने वकिलाने बुट फेकून मारावा असे त्यांचे वक्तव्य होते का? गवईंच्या बोलण्यातून सनातन धर्माचा अपमान झाला अशी जी आवई उठवली गेली, त्यामागे योजनाबध्द कारस्थान होते का? यापुर्वी डॉ. मनमोहन सिंग, पी. चिदंबरम, लालकृष्ण अडवाणी, राहुल गांधी, शरद पवार, अरविंद केजरीवाल, ओमर अब्दुल्ला, नितीन गडकरी यांच्यावरही बूट फेकल्याच्या घटना घडल्या होत्या. सरन्यायाधीशांवरील हल्ल्याची इंग्रजी आणि भाषिक वृत्तपत्रांनी दखल घेतली पण वृत्तवाहिन्यांनी या घटनेला फारसे महत्व दिले नाही. **

## निवडक

### साईराज देणार फिरकीचे धडे



**चंदीगड :** आयपीएलच्या आगामी हंगामासाठी पंजाब किंग्जने साईराज बहुतुलेची फिरकी गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. ५२ वर्षीय बहुतुलेने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत भारतासाठी २ कसोटी आणि ८ एकदिवसीय सामने खेळले आहेत. २०२३ पासून सुनील जोशी पंजाब किंग्जच्या फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकपदी होते. मात्र आता त्यांची जागा बहुतुलेने घेतली आहे. या आधी बहुतुले याने केरळ, गुजरात, विदर्भ, बंगाल या देशांतर्गत संघांसह आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सचे प्रक्षिक्षकपद भूषवले आहे. बहुतुलेचे स्वागत करताना पंजाब किंग्जचे सीईओ सतीश मेनन म्हणाले की, सुनील जोशी यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे आभारी आहोत. बहुतुले यांना आमच्या प्रशिक्षक पथकात सामील करून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत. बहुतेले यांचे गोलंदाजीतील ज्ञान, देशांतर्गत गोलंदाजांना मार्गदर्शनाचा व्यापक अनुभव आणि रणनीतीची कौशल्य संघासाठी उपयुक्त ठरणार आहेत.



### कबड्डीमध्ये दुहेरी सुवर्ण

**मुंबई :** बहरीन येथे झालेल्या तिसऱ्या आशियाई युथ क्रीडा स्पर्धेतील कबड्डीत भारताने दुहेरी सुवर्णपदक पटकविले. पहिल्या झालेल्या मुलींच्या अंतिम सामन्यात भारतीय मुलींनी इराणाला ७५-२१ असे सहज नमवीत सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्यानंतर झालेल्या मुलांच्या अंतिम सामन्यात भारताने अतितटीच्या लढतीत इराणला ३५-३२ असे चकवीत सुवर्णपदक आपल्याकडे खेचून आणले. मुलींच्या अंतिम सामन्यात लिलाया विजय मिळवीत असताना म्हराष्ट्राच्या सेरेना म्हसकर हिने आपल्या अष्टपैलू खेळाची चुणूक दाखविली. मुलांचा सामना मात्र अत्यंत चुरशीने खेळला गेला. इराणाने आक्रमक सुरुवात करीत सलग २ गुण घेत आघाडी घेतली. पण त्याने दबून न जाता भारताने संयमी खेळ करीत हळूहळू गुण घेत ४-२ अशी आघाडी मिळविली. भारताने आघाडी घेतली, पण इराणाचा दबाव झुगारून देण्यात ते कमी पडले. सामान्याच्या शेवटच्या क्षणात रंगत अधिकच वाढली. इराणने आक्रमक खेळ करीत भारताला दडपणाखाली आणले. अखेर भारताने ३ गुणांनी सामना खिशात टाकला. या सामन्यात देखील महाराष्ट्राचा खेळाडू चमकला. महाराष्ट्राच्या प्रसाद दिघोळे यांनी दोन खेळाडूंत इराणच्या खेळाडूची अव्वल पकड करीत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. महाराष्ट्राचे हे दोन्ही खेळाडूचे रविवार दि. २६ ऑक्टोबर रोजी दुपारी ११-२० वा. मुंबईतील टर्मिनन्स नंबर २ येथे आगमन होणार आहे.

### भारताच्या तन्वीचा ऐतिहासिक पराक्रम

**गुवाहाटी :** भारताच्या तन्वी शर्माने शुक्रवारी ऐतिहासिक पराक्रम केला. १६ वर्षीय तन्वीने जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत पदक निश्चित केले. स्पर्धेच्या इतिहासात गेल्या १७ वर्षांत प्रथमच एका भारतीयाने पदक पक्के केले आहे. गुवाहाटी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अग्रमानांकित तन्वीने महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या साकी मासुमोटोला १३-१५, १५-९, १५-१० असे तीन गेममध्ये पराभूत केले. तिने ४७ मिनिटांत ही लढत जिंकून उपांत्य फेरी गाठली. नॅशनल सेंटर ऑफ एक्सिलन्स येथे ही स्पर्धा सुरू आहे. यापूर्वी अर्पणा पोपट व सायना नेहवाल यांनी कनिष्ठ स्पर्धेत पदके जिंकली होती. अर्पणा यांनी १९९६मध्ये रौप्य, तर सायनाने २००६मध्ये रौप्यपदक पटकावले होते. त्यानंतर सायनाने २००८ मध्ये सुवर्णपदकही जिंकले. तन्वीसुद्धा आता सुवर्ण काबिज करेल, अशी आशा आहे. महिला एकेरीत भारताची अन्य स्पर्धक उन्नती हूडाला मात्र उपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला. थायलंडच्या अन्यापतने तिला धूळ चारली. त्याशिवाय मिश्र दुहेरीत भाव्य छाबरा व विशाखा टोप्पो यांचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. चायनीज तैपई जोडीने त्यांच्यावर मात केली.



# रोहितच्या शतकाने शेवट गोड




रोहितचे 50 वे शतक

कांगारुंचा 9 विकेट्सने धुव्वा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

रोहित शर्मा-विराट कोहली या अनुभवी तसेच माजी कर्णधारांच्या जोडीने ऑस्ट्रेलिया विरुद्ध तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात नाबाद दीडशतकी भागीदारी करत भारतीय संघाला ९ विकेट्सने दणदणीत विजय मिळवून दिला आहे. ऑस्ट्रेलियाने भारताला सिडनी क्रिकेट ग्राउंडमध्ये विजयासाठी २३७ धावांचे आव्हान दिले होते. भारताने हे आव्हान ३८.३ ओव्हरमध्ये १ विकेटच्या मोबदल्यात सहज पूर्ण केले. भारताने या विजयासह ऑस्ट्रेलियाला ३-० ने मालिका जिंकण्यापासून रोखले. भारताने ही मालिका १-२ ने गमावली. मात्र रोहित आणि विराट या दोघांनी केलेल्या भागीदारीने चाहत्यांची मनं जिंकली.

रोहित आणि गिलने भारताला अप्रतिम सुरुवात करुन दिली. दोघांनी ६९ धावा जोडल्या. त्यानंतर शुबमन २४ धावांवर बाद झाला. शुबमननंतर विराट मैदानात आला. विराट गेल्या २ सामन्यांमध्ये सलग शून्यावर बाद झाला होता. मात्र विराटने सिडनीत पहिलीच धाव घेत सुटकेचा निश्वास सोडला. त्यानंतर विराटनेही रोहितसह मैदानात घट्ट पाय रोवले. या जोडीने अखेरपर्यंत नाबाद राहत भारताला एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या सामन्यात विजयी केले.

भारतीय संघाचा अनुभवी फलंदाज रोहित शर्मा याला ऑस्ट्रेलिय विरूद्धच्या पहिल्या सामन्यात दुहेरी आकडाही गाठता आला नव्हता. रोहित पर्थमध्ये ८ धावांवर बाद झाला होता. त्यानंतर रोहितने दुसऱ्या सामन्यात जोरदार कमबॅक केले. रोहितने एडलेडमध्ये ७३ धावांची खेळी केली. त्यानंतर रोहितने या मालिकेतील तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात कमाल केली आहे. रोहितने ऑस्ट्रेलिया विरुद्ध २३७ धावांचा पाठलाग करताना खणखणीत शतक झळकावलं आहे. रोहितच्या कारकीर्दीतील हे ३३ वं शतक ठरलं आहे. रोहितने या शतकासह भारतीय संघाला विजयाच्या आणखी जवळ आणून ठेवले आहे. रोहितने अवघ्या ६३ चेंडूत एकदिवसीय कारकीर्दीतील ६० वं अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर रोहितने गिअर बदलला. रोहितने फटकेबाजी करत १०५ चेंडूत शतक पूर्ण केले. रोहितने शतक पूर्ण करताच साऱ्या मैदानात क्रिकेट चाहत्यांचा एकच जल्लोष पाहायला मिळाला.तर ऑस्ट्रेलियासाठी जोश हेझलवूड याने एकमेव विकेट मिळवली. याआधी ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्शनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाचा संघ ४६.४ षटकांत २३६ धावांवर आटोपला. मिचेल मार्श (४१ धावा) आणि ट्रॅव्हिस हेड (२९ धावा) यांनी संघाला चांगली सुरुवात दिली. यानंतर मॅट रेनशॉने ५६ धावा केल्या. परंतु भारताच्या गोलंदाजांनी नियमितपणे विकेट घेत दबाव कायम ठेवला. मॅट शॉर्ट (३०), ॲलेक्स केरी (२४) आणि कूपर कॉनोली (२३) यांनीही छोटेखानी योगदान दिलं, परंतु कोणीही मोठा डाव खेळू शकला नाही. भारतीय गोलंदाजांनी शेवटच्या षटकांमध्ये विकेट्स घेतल्या आणि कांगारु संघाला पूर्ण ५० षटकंही खेळू दिली नाहीत. भारताकडून वेगवान गोलंदाज हर्षित राणानं शानदार गोलंदाजी करत ८.४ षटकांमध्ये ३९ धावा देत ४ बळी घेतले. त्याच्या व्यतिरिक्त, वॉशिंग्टन सुंदरनं २ बळी घेतले, तर सिराज, अक्षर पटेल, प्रसिद्ध कृष्णा आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. अक्षर पटेल सर्वात किफायतशीर होता, त्यानं ६ षटकांमध्ये फक्त १८ धावा देत एक बळी घेतला.

#### आंतरराष्ट्रीय शतकांचे अर्धशतक

**रोहितने शतकासाठी १०५ चेंडूंचा सामना केला. रोहितने या खेळीत ११ चौकार आणि २ षटकार लगावले. रोहितने ९५.२४ च्या स्ट्राईक रेटने हे शतक पूर्ण केले. रोहितचं ऑस्ट्रेलिया विरुद्धचं एकदिवसीय कारकीर्दीतील नववे शतक ठरले. विशेष म्हणजे रोहितने यासह शतकांचं अर्धशतक पूर्ण केले. रोहितच एकदिवसीय, कसोटी आणि टी २० या तिन्ही फॉर्मेटमधील मिळून हे ५० वे शतक ठरले आहे.**

पीएनपीच्या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय

## मैदानी स्पर्धेसाठी निवड

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने व पिल्लई एचओसीएल शाळा रसायनी यांच्या विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा २०२५/२०२६ पीएनपी होली चाईल्ड स्कूल वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

१७ वर्षा खालील मुलांमध्ये अमर जुगीलाल निषाद ३००० मीटर धावणे तृतीय क्रमांक १९ वर्षा खालील मुलांमध्ये शिव शिवराम निषाद बांबू उडी प्रथम क्रमांक मिळवून त्यांची मुंबई विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत निवड झाली आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील, होली चाईल्ड एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले व उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा मार्गदर्शक अक्षय डाकी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## पाकिस्तानचा सुपडासाफ

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

२०२५ च्या आयसीसी वनडे विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानी महिला संघाने एकूण ७ सामने खेळले, त्यापैकी ४ सामने गमावले. पाकिस्तानी महिला संघाला बांगलादेश, भारत, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाविरुद्धच्या सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला. बांगलादेशकडून त्यांचा ७ विकेट्सनं पराभव झाला, तर भारतीय महिला संघाविरुद्ध ८८ धावांनी, ऑस्ट्रेलियाविरुद्ध १०७ धावांनी आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाविरुद्ध १५० धावांनी पराभव पत्करावा लागला. शिवाय, पाकिस्तानी महिला संघाचे इंग्लंड, न्यूझीलंड आणि श्रीलंका महिला संघांविरुद्धचे सामने पावसामुळं रद्द झाले.

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये

## चौक शाळेची दमदार कामगिरी



**| रसायनी | प्रतिनिधी |**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यावतीने आयोजित विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय आणि दमदार कामगिरी करून आपली छाप पाडली आहे.

मुंबई विभाग स्तरीय स्क्वॅश स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सोनिया वाघमारे हिने सुवर्णपदक पटकावले असून तिची व साहिल वाघमारे यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच रायगड जिल्हा व खालापूर तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धांमध्येही चौक शाळेच्या संघांनी चमकदार कामगिरी केली आहे.

याशिवाय मैदानी स्पर्धांमध्येही शाळेच्या खेळाडूंनी १४, १७ व १९ वर्षाखालील वयोगटात एकूण १२ सुवर्ण, १६ रौप्य आणि ८ कांस्य पदके मिळवत शाळेचा झेंडा उंचावला आहे.

या सर्व खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक शरद कुंभार सर यांनी प्रशिक्षित केले असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय पातळीपर्यंत मजल मारली आहे.

शाळेच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्या प्रसारिणी सभा चौक संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.अविनाश देशमुख, शोभा देशमुख, नरेंद्र शहा, योगेंद्र शहा तसेच सर्व शिक्षकांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने आयोजित केलेल्या विविध स्पर्धेत सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे त्यांचे कौतुक केले जात आहे.

**स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे**

**खो-खो स्पर्धा :**

**१४ वर्षाखालील मुले व मुली - प्रथम क्रमांक**

- **१७ वर्षाखालील मुले प्रथम क्रमांक**
- **१७ वर्षाखालील मुली द्वितीय क्रमांक**
- **१९ वर्षाखालील मुले व मुली द्वितीय क्रमांक**

**कबड्डी स्पर्धा :**

- **१४ वर्षाखालील मुली - प्रथम क्रमांक**
- **१७ वर्षाखालील मुले द्वितीय क्रमांक**

## गोगटे महाविद्यालयाला व्हॉलीबॉलमध्ये सुवर्ण

**रत्नागिरी :** गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या संघाने विद्यापीठ अंतर्गत कोकण विभाग पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेचे सुवर्णपदक प्राप्त केले. शैक्षणिक वर्षात मुंबई विद्यापीठ अंतर्गत कोकण विभाग पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेचे सांघिक विजेतेपद पटकावले आहे.सुवर्णपदक विजेत्या पुरुष व्हॉलीबॉल संघामध्ये वरुण वारसे, साहिल कुवार, आदित्य साळुंके, अथर्व घडशी, हर्ष मोरे, श्रेयस काजरेकर, साहिल कुरटे, पार्थ पाटील, दुर्गेश सावंत, राज सावंत, प्रतीक भुवड, सर्वेश बारगोडे, तन्मय लाखण आणि पाटील या विद्यार्थ्यांचा समावेश होता. डॉ. विनोद शिंदे, प्रा. कल्पेश बोटके, गौरांग कुर्टे, मिनार कुर्टे यांचे मार्गदर्शन लाभले.

## शौर्याला अडथळा शर्यतीत रौप्यपदक

**| बहारीन | वृत्तसंस्था |**

भारताची १६ वर्षीय धावपटू शौर्या अंबुरे (महाराष्ट्र) हिने येथे सुरू असलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये १०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक जिंकून आपला २०२५ चा उत्कृष्ट फॉर्म कायम राखला आहे. अंतिम फेरीत तिने १३.७३ सेकंद अशी वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवत मोठी कामगिरी केली. दरम्यान, शुक्रवारी भारताने या स्पर्धेत ट्रॅक आणि फिल्डमध्ये तीन पदके जिंकली. यामध्ये शौर्य अंबुरेसह पलाश मंडल आणि जस्मिन कौर यांचा समावेश आहे.



शौर्यासाठी हे रौप्यपदक खूप महत्त्वाचे ठरले. कारण, यंदाच्या हंगामातील हे तिचे तिसरे मोठे आंतरराष्ट्रीय पदक आहे. यापूर्वी तिने भुवनेश्वर येथील राष्ट्रीय ज्युनियर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले होते.

आशियाई १८ वयोगटाच्या चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक मिळवले होते. आशियाई स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तिची हीटमधील वेळ १४.०० सेकंद होती. परंतु, अंतिम फेरीत तिने १३.७३ सेकंदांपर्यंत सुधारणा केली, जी तिचा दबावाखाली सर्वोत्तम कामगिरी करण्याचा आत्मविश्वास दाखविला आहे.

पलाश मंडलला 'कांस्य'भारताच्या पलाश मंडलने ५००० मीटर चालण्याच्या शर्यतीत २४ मिनिटे ४८.९२ सेकंद (२४:४८.९२) वेळेची नोंद करत कांस्यपदक मिळविले.

चीनच्या खेळाडूंनी या शर्यतीत वर्चस्व राखले. हाओझे झांगने २१:४३.८२ सेकंद वेळेसह सुवर्णपदक जिंकले, तर यूजी लू याने २२:२८.६४ सेकंद वेळेसह रौप्यपदक पटकावले. दरम्यान, भारताच्या जस्मिन कौरने महिलांच्या गोळाफेक प्रकारात कांस्यपदक संपादन केले. तिने १४.८६ मीटर गोळाफेक केली. तिची सहकारी जॉय बैदवान १४.५३ मीटरसह सहाव्या स्थानावर राहिली. १०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक जिंकून आपला २०२५ चा उत्कृष्ट फॉर्म कायम राखल्यामुळे तिच्या कडून पदकाच्या अशा होत्या.

एमएमएस सामना जिंकणारा पहिला भारतीय ठरला | ९० सेकंदामध्ये पाकिस्तानच्या नासिरचा केला पराभव

## कुस्तीगीर संग्राम सिंहने रचला इतिहास

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताचा सुप्रसिद्ध कुस्तीपटू आणि पीठ इंडिया आयकॉन संग्राम सिंग लवकरच ॲमस्टरडॅममधील लेव्हल्स फाईट लीगमध्ये युरोपियन एमएमए मध्ये पदार्पण करताना दिसणार आहे. कॉमनवेल्थ हेवी वेट चॅम्पियन संग्राम सिंग हा युरोपमध्ये या पातळीवर स्पर्धा करणारा पहिला भारतीय कुस्तीगीर असणार आहे. त्याआधी त्याच्या संदर्भात मोठी बातमी समोर आली आहे.

संग्राम सिंह याने आता इतिहास रचला आहे, फक्त ९० सेकंदामध्ये भारतीय कुस्तीगीर संग्राम सिंह यांने गामा आंतरराष्ट्रीय लढाई स्पर्धेमध्ये पाकिस्तानच्या अली रझा नासिरचा पराभव करून इतिहास घडवला आहे.



पाकिस्तानी प्रतिस्पर्धा विरुद्ध एमएमएस सामना जिंकणारा तो पहिला भारतीय पुरुष फायटर ठरला आहे. या विजयाला आणखी प्रेरणादायी बनवणारी गोष्ट म्हणजे संग्रामचा खडतर प्रवास. एकेकाळी संधिवातामुळे व्हीलचेअरवर अडकलेल्या असताना, त्याने प्रचंड आव्हानांना तोंड दिले परंतु शिस्त, धैर्य आणि अथक परिश्रमाने वेदनांना शक्तीत रूपांतरित केले.

> **लेव्हल्स फाईट लीग मला युरोपमध्ये माझे कौशल्य दाखवण्याचा आणि भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान देते. माझे ध्येय तरुण खेळाडूंना मोठे स्वप्न पाहण्यास प्रेरित करणे आणि हे सिद्ध करणे आहे की जेव्हा हृदय आणि कठोर परिश्रम एकत्र येतात तेव्हा काहीही अशक्य नाही.**
>
> **-संग्राम सिंग**

आज, तो जागतिक विजेता म्हणून उंच उभा आहे. हा विजय केवळ वैयक्तिक विजय नाही तर संपूर्ण देशासाठी अभिमानाचा क्षण आहे.

कुस्तीतून एमएमएमध्ये संक्रमण करणारा ४० वर्षांपेक्षा जास्त वयाचा पहिला खेळाडू आहे - जो त्याच्या फिटनेस, शिस्त आणि स्पर्धात्मक उत्कृष्टतेचा पुरावा आहे. संग्रामचा एमएमए प्रवास त्याचे प्रशिक्षक भूपेश कुमार यांनी घडवला, ज्यांनी जॉर्जियामध्ये संग्रामच्या पहिल्या एमएमए पदार्पणात प्रशिक्षण आणि रणनीतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. त्या पदार्पणात, संग्रामने पाकिस्तानविरुद्ध विक्रमी वेळेत विजय मिळवला आहे.

## पाकची हॉकी विश्वचषकातून माघार

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारत आणि पाकिस्तानमधील बिघडलेल्या क्रीडा संबंधांमुळे पाकिस्तानने येत्या नोव्हेंबर-डिसेंबर (२०२५) मध्ये भारतात होणार्या पुरुष ज्युनिअर हॉकी विश्वचषक स्पर्धेतून माघार घेतली आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) शुक्रवारी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. अलीकडील दहशतवादी हल्ले आणि त्यानंतर भारत-पाकिस्तानमधील बिघडलेले संबंध. भारताचे नवीन धोरण ज्यामुळे द्विपक्षीय (बायलॅटरल) क्रीडा स्पर्धांवर निर्बंध आले आहेत. या पार्श्वभूमीवर पाकिस्तान हॉकी महासंघाने (पीएचएफ) खेळाडूंच्या सुरक्षेचे कारण देत माघार घेतली आहे. पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानने भारतीय स्पर्धेतून माघार घेण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बिहारमधील राजगीर येथे झालेल्या पुरुषांच्या आशिया कप हॉकी स्पर्धेतूनही पाकिस्तानने माघार घेतली होती. त्रयस्थ ठिकाणाची मागणीमोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा चुकवू नये, यासाठी पाकिस्तान हॉकी महासंघ (पीएचएफ) आता स्पर्धेसाठी तटस्थ ठिकाण (न्यूट्रल वेन्यू) मिळावे, यासाठी आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाकडे (एफएचआय) मागणी करत आहे. ज्युनिअर हॉकी विश्वचषक स्पर्धा २८ नोव्हेंबर ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत चेन्नई आणि मदुराई येथे होणार आहे. स्पर्धेत पाकिस्तानला भारत, चिली आणि स्वीत्झर्लंडसह 'ब' गटात आहेत. या स्पर्धेतून पाकिस्तान माघार घेतल्यामुळे आता त्यांच्या जागी कोणत्या संघाचा समावेश करण्यात येणार याबाबतची घोषणा लवकरच केली जाईल. भारताने पाकिस्तानसोबत द्विपक्षीय सामने न खेळण्याचे धोरण ठेवले असले, तरी बहुराष्ट्रीय (बायलॅटरलत) स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली आहे, असे असू-नही पाकिस्तानने माघार घेतल्याने दोन्ही देशांतील क्रीडा संबंध अधिक तणावाचे बनले आहेत.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)